# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक

शुक्रवार, २८ मार्च २०२५ | वर्षः ६ | अंकः९९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## पुतीन येणार भारत दौऱ्यावर

**नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी**

याचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन लवकरच भारत भेटीवर येणार आहेत. गेल्यावर मॉस्को दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना भेटीचं आमंत्रण दिलं होतं. २०२२ पासून रशियाचे युक्रेनबरोबर युद्ध सुरू आहे. या युद्धच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्लादीमीर पुतिन यांच्या सातत्याने संपर्कात होते, त्यामुळे त्यांच्यात जवळचे संबंध निर्माण झाले आहे. दरम्यान, पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असणार आहे. रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी सांगितले की पुतिन यांच्या भारतभेटीच्या तारखा निश्चित झाल्या नसल्या तरीही त्यांच्या भारत भेटीची तयारी सुरू आहे. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी भारतीय सरकार प्रमुखांकडून भेटीचे निमंत्रण स्वीकारले आहे," तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी रशियाची निवड केली होती. हे लक्षात घेऊन लावरोव्ह म्हणाले, "आता आपली पाळी आहे."

# हिंदुत्व सोडल्याचे भाजपाने जाहीर करावे

## 'सौगात ए मोदी' वरुन उद्धव ठाकरे आक्रमक

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने (भाजप) देशभरातील ३२ लाख गरीब मुस्लिम कुटुंबांसाठी 'सौगात-ए-मोदी' या उपक्रमांतर्गत ईद साजरी करण्यासाठी विशेष किट्स वाटप करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार टीका करत भाजपला खडा सवाल विचारला आहे. स्वतःला कट्टर हिंदुत्ववादी म्हणून मिरवणाऱ्या भाजपच्या या कृतीला "सौगात-ए-सत्ता" संबोधत ठाकरे यांनी या उपक्रमामागील राजकीय हेतूंवर बोट ठेवले आहे.

**"सौगात-ए-मोदी की सौगात-ए-सत्ता?"**

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'सौगात-ए-मोदी' उपक्रमाला ढोंगीपणाचा ठपका ठेवला. "हा सौगात-ए-मोदी कार्यक्रम नाही, तर हे सौगात-ए-सत्ता आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकीपर्यंतच हे असणार आहे की, यापुढेही हे चालणार आहे?" असा थेट सवाल ठाकरे यांनी भाजपला विचारला. त्यांनी पुढे सांगितले की, ज्या भाजपने मुस्लिम मतदारांनी आम्हाला (शिवसेनेला) पाठिंबा दिल्यावर "सत्ता जिहाद" असा आरोप केला होता, तेच आता ईदच्या निमित्ताने 32 लाख मुस्लिम कुटुंबांच्या घरी जाऊन सौगात वाटप करत आहेत. "ही केवळ बेशरमपणाची कृती आहे," असे ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "आम्हाला हिंदुत्व सोडले म्हणणारे उडाणटप्पू आता मोदींची सौगात कशी घेऊन जातात, हे पाहायचे आहे," असा टोला त्यांनी लगावला. तसेच, "आता भाजपने हिंदुत्व सोडले आहे का?" असा सवाल करत त्यांनी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ठाकरे यांनी पुढे सांगितले, "जे लोक मला हिंदुत्व सोडल्याचा आरोप करतात, त्यांनी आधी आपल्या झेंड्यातील हिरवा रंग काढावा. आता हिंदू महिलांच्या मंगळसूत्रांचे रक्षण कोण करणार? खरे हिंदुत्ववादी पक्ष आता शिल्लक राहिले आहेत का?" असे प्रश्न उपस्थित करत भाजपच्या हिंदुत्वाच्या दाव्यावर हल्ला चढवला.

**"टोपी घालणारे उडाणटप्पू"**

उद्धव ठाकरे यांनी भाजप नेत्यांवर "टोपी घालणारे उडाणटप्पू" असा हल्ला चढवला. "जे लोक कालपर्यंत मुस्लिमांविरोधात आग



ओकत होते, ते आता टोपी घालून सौगात वाटप करत आहेत. ही दुटप्पी भूमिका आहे," असे ठाकरे म्हणाले. त्यांनी भाजपला आव्हान देत म्हटले की, "सौगात-ए-सत्ता फक्त बिहार आणि उत्तर प्रदेशच्या निवडणुकीपुरते आहे की पुढेही चालणार, हे भाजपने स्पष्ट करावे. नाहीतर त्यांनी जाहीरपणे सांगावे की त्यांनी हिंदुत्व सोडले आहे."

भाजपच्या अल्पसंख्याक मोर्चाने २५ मार्च २०२५ रोजी 'सौगात-ए-मोदी' उपक्रमाची सुरुवात केली. या अंतर्गत देशभरातील ३२ लाख गरीब मुस्लिम कुटुंबांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट्स वाटप करण्यात येणार आहेत. या किट्समध्ये खजूर, सेवई, सलवार-कमीज, कुर्ता-पायजामा आणि ड्राय फ्रूट्स यांसारख्या वस्तूंचा समावेश आहे. हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाने राबवला जात असून, यामागे मुस्लिम समुदायाशी संबंध सुधारण्याचा हेतू असल्याचा दावा भाजपने केला आहे. मात्र, हा उपक्रम बिहार आणि उत्तर प्रदेशातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

उद्धव ठाकरे यांनी या उपक्रमाला "सौगात-ए-सत्ता" संबोधत त्यामागील राजकीय हेतूंवर बोट ठेवले. "हा उपक्रम केवळ निवडणुकीपुरता आहे. बिहार आणि उत्तर प्रदेशात मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्यासाठी भाजपने ही खेळी खेळली आहे," असे ठाकरे म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, ज्या भाजपने मुस्लिम समुदायाला नेहमीच लक्ष्य केले, त्यांच्या घरांचे बुलडोझरने विध्वंस केले, आता तेच लोक सौगात घेऊन त्यांच्या दारात पोहोचत आहेत. "हा निव्वळ ढोंगीपणा आहे," असे ठाकरे यांनी ठणकावले.

भाजपने 'सौगात-ए-मोदी' उपक्रमाची घोषणा अशा वेळी केली आहे, जेव्हा बिहार आणि उत्तर प्रदेशात निवडणुकीची तयारी जोरात सुरू आहे. या दोन्ही राज्यांमध्ये मुस्लिम मतदारांचा मोठा वर्ग आहे, आणि त्यांचा पाठिंबा मिळवणे भाजपसाठी महत्त्वाचे मानले जाते. यापूर्वी, वक्फ तरमीम विधेयक आणि मॉब लिंचिंगच्या घटनांमुळे मुस्लिम समुदायात भाजपविरोधी नाराजी वाढली होती. या पार्श्वभूमीवर, 'सौगात-ए-मोदी' हा उपक्रम मुस्लिम समुदायाशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न मानला जात आहे. मात्र, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांनी या उपक्रमाला राजकीय स्टंट ठरवले आहे.

उद्धव ठाकरे यांनी 'सौगात-ए-मोदी' उपक्रमावर जोरदार टीका करत भाजपच्या हिंदुत्वाच्या दाव्यावर आणि या उपक्रमामागील राजकीय हेतूंवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी या उपक्रमाला "सौगात-ए-सत्ता" संबोधत भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. या टीकेमुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे, आणि येत्या काळात यावर अधिक प्रतिक्रिया उमटण्याच्या शक्यता आहेत.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### बिर्ला - गांधी यांची गट्टी ?

राहुल गांधी यांनी लोकसभेचे सभापती जे लोकसभेचे अध्यक्षही असतात. त्यांच्यावर म्हणजेच ओम बिर्ला यांच्यावर काही आरोप केलेले आहेत. अध्यक्ष आपल्याला बोलून देत नाहीत. असे राहुल गांधी यांनी अगदी ठामपणे सांगितले. अध्यक्षांनी सदस्यांना सांगितलेले आहे की, या सदनाची गरिमा कायम ठेवली पाहिजे. सदस्यांनी हे कधीच विसरू नये. तसेच विरोधी पक्ष नेते राहुल गांधींनी नियम ३४९ नुसार वागावे असे बिर्ला म्हणतात. ओम बिर्ला यांना एखाद्या सदस्याची वागणूक खटकली. तर त्यावर संबंधित सदस्याला तंबी देण्याचा अधिकार असतो. राहुल गांधी यांनी जर नियमांचे उल्लंघन केले असेल. तर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींवर केलेले आरोप गंभीर असले पाहिजेत. या आरोपांचे स्पष्टीकरण देण्यासाठी राहुल गांधी जेव्हा उभे राहिले. तेव्हा अध्यक्षांनी सभागृह तहकूब केले. ज्यांच्यावर आरोप केले. त्यांचे उत्तर एकण्याच्या आधीच अध्यक्षांनी सदन स्थगित केल्याचा राहुल गांधींचा आरोप आहे. राहुल गांधी म्हणतात. त्याप्रमाणे त्यांना अनेक विषयांवर बोलायचे होते. कुंभमेळ्याचे आयोजन चांगले झाले, हे सुद्धा आपल्याला सांगायचे होते. त्या सोबतच बेरोजगारीचा मुद्दाही तेवढाच महत्त्वाचा होता. पण अध्यक्षांनी सभागृह स्थगित केल्यामुळे आपल्याला बोलताच आले नाही. हे राहुल गांधी यांनी नमूद केलेले आहे. २०१४ आणि २०१९ या दोन लोकसभेच्या निवडणुकांनंतर लोकसभेत अपेक्षित संख्याबळ न आल्याने विरोधी पक्ष नेतेपदच अस्तित्वात नव्हते. पण यावेळी काँग्रेसने शंभर खासदारांचा आकडा जुळवल्याने नियमाप्रमाणे त्यांना विरोधी पक्षनेता पद देणे भाग होते. लोकशाहीत बहुमताचा नेता सदनाचाही नेता असतो. त्यामुळेच त्यांच्या महत्त्वाबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सत्ताधारी पक्षाप्रमाणेच विरोधी पक्ष नेतेपद सुद्धा तेवढेच महत्त्वाचे असते. त्या पदाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा असतो. त्यामुळे लोकसभेचे कामकाज व्यवस्थितपणे चालवण्यासाठी सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षालाही स्थान असते. हे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही ठाऊक आहे. या पदाचा मान फार मोठा असतो. लोकसभेचे पहिले अध्यक्ष मावळंकर हे अनेकदा सत्ताधारी पक्षालाही झापत असत. त्यानंतरही आपल्या लोकसभेने अनेक दबंग अध्यक्ष पाहिलेले आहेत. सोमनाथ चॅटर्जी यांनी तर अध्यक्षपदावर विराजमान झाल्यानंतर आपल्या पक्षाची सदस्यताही सोडली होती. अशी अनेक उदाहरणे आहेत. १९७१ नंतर अध्यक्ष पदापेक्षा पंतप्रधान पदावरील व्यक्तीला जास्त महत्त्व आल्याचे दिसते. २०१४ सालामध्ये सुमित्राताई महाजन यांना अध्यक्षपदावर बसविण्यात आले होते. त्यांनी सत्तारूढ आणि विरोधी पक्षांबरोबर चांगला समन्वय साधला होता. २०१९ सालापासून ओम बिर्ला यांच्याकडे हे पद आलेले आहे. जशी सदनाची गरिमा असते. तशीच त्या पदाचीही गरिमा असावी. हा बिर्लाजींचा मुद्दा कोण अमान्य करेल. परंतु या सर्व पदांची गरिमा कायम ठेवण्यासाठी दोन्ही बाजूंकडून तसे प्रयत्न झाले पाहिजेत. ओम बिर्ला यांनी आता अध्यक्षपदावर असताना तसा आदर्श घालून दिला पाहिजे. म्हणजेच विरोधी पक्षांनाही तक्रारी करण्याची गरज भासणार नाही. लोकशाहीचे हे मंदिर पवित्र रहावे. संसदीय भवन संविधान संमत राहावे. यासाठी अध्यक्षांना सर्वाधिकार आहेतच. ते त्यांनी वापरावे. पण कुणावरही अन्याय होणार नाही. हेही बघावे एवढीच अपेक्षा आहे. शेवटी एक गमतीशीर गोष्ट सांगावीशी वाटते. उद्योगपती घनश्यामदास बिर्ला आणि मोहनदास करमचंद गांधी यांची चांगलीच गट्टी म्हणजेच संवादपूर्ण मैत्री होती. तशीच गट्टी या बिर्लाजींनी या गांधींसोबत ठेवावी. मात्र सध्या अशी गट्टी जमेल का. हा प्रश्न असला तरी, तशी अपेक्षा आपण का ठेवू नये.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## फडणवीसांनी भीमा कोरेगावसारखी चूक पुन्हा करू नये - प्रकाश आंबेडकर

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीवरून छत्रपती संभाजीराजे आणि भिडे गुरुजी यांच्यात सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी एक महत्त्वाची मागणी केली आहे. मला या वादावर फार बोलायचे नाही. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी राजधर्माचे पालन करून संभाजी भिडे यांना तुरुंगात टाकावे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. ते गुरुवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मला देवेंद्र फडणवीस यांना एवढंच सांगायचं आहे की, तुम्ही आज राज्याचे मुख्यमंत्री आहात. तुम्ही अटलबिहारी वाजपेयी यांना आठवा. जो कोणी राजदंड हातात घेतो, त्याला राज्य चालवता आलं पाहिजे. जो कोणी कायद्याला मानत नसेल त्याला आतमध्ये तुरुंगात टाकण्याची संधी असली पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी भीमा कोरेगावच्या वेळेस संभाजी भिडेंना पाठिशी घातलं, एकप्रकारे बळ दिलं. ती चूक आता पुन्हा करू नका, ही माझी अपेक्षा असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

**सौगात-ए-मोदीवरून प्रकाश आंबेडकरांची टीका**

भाजपकडून रमजान ईदच्या



मुहूर्तावर देशातील मुस्लीम समुदायाला 32 लाख सौगात-ए-मोदी किट वाटण्यात येणार आहेत. या किटमध्ये खाण्यापिण्याचे पदार्थ आणि कपडे असणार आहेत. यावरून प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला लक्ष्य केले. इतर पक्ष वाटप करतात आणि भाजप आरएएस करते तेव्हा वेगळा संदर्भ येतो. 1999 पासून सत्तेत आल्यापासून ॲंटी मुस्लिम भूमिकेचा स्टॅंड राहिलेला आहे. गोध्रा घडवण्यात आलेलं आहे. रेल्वेचे डब्बे जुने घेतले, जळाले नाही आणि आतून जळालेत. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर अखलाक, शाबीर यांचे मॉब लिंचिंग केलं जातं आणि त्याचे व्हीडिओ आपल्याला मिळतात. मुस्लिमांना साईडट्रॅक करायचं, हा भाजप आणि आरएसएसचा प्रयत्न आहे. त्यामुळे सौगात ए मोदी कार्यक्रम येतो तेव्हा शंका येते. हा राजकीयदृष्टीनं केलेला हा कार्यक्रम आहे.

# महाराष्ट्र विधिमंडळाच्या विविध समित्या जाहीर

## सत्ताधारी-विरोधकांमध्ये वाटपाचा तिढा सुटला

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी विधिमंडळाच्या विविध समित्यांची घोषणा करण्यात आली. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी (मविआ) यांच्यातील राजकीय समीकरणांचा विचार करत या समित्यांचे प्रमुखपदांचे वाटप करण्यात आले आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे नियम समितीचे प्रमुखपद देण्यात आले असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत समितीचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. या घोषणेमुळे महायुतीतील अंतर्गत समन्वय आणि विरोधकांना दिलेली जबाबदारी चर्चेचा विषय ठरली आहे.

**राजकीय समीकरणे आणि वाद**

या समित्यांच्या वाटपात महायुतीतील भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील समन्वय दिसून आला. राहुल नार्वेकर आणि अजित पवार यांच्यासारख्या दिग्गजांना महत्त्वाची समिती मिळाल्याने महायुतीतील शक्तीप्रदर्शन स्पष्ट झाले आहे. अण्णा बनसोडे यांना उपाध्यक्षपदाबरोबरच तदर्थ समितीचे नेतृत्व देऊन अजित पवार गटाला बळ देण्याचा प्रयत्न दिसतो. दुसरीकडे, विरोधकांना फारशी महत्त्वाची समिती न देण्याचा आरोप मविआने केला आहे. विजय वडेट्टीवार यांना लोकलेखा समिती देऊन काँग्रेसला काही प्रमाणात समाधान मानावे लागले असले, तरी संपूर्ण वाटपावरून नाराजी व्यक्त होत आहे.

**विरोधकांचा आक्षेप**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जयंत पाटील यांनी या वाटपावर टीका केली. "सत्ताधाऱ्यांनी आपल्याच नेत्यांना समित्या दिल्या आहेत. विरोधकांचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न आहे. लोकलेखा समिती सोडली तर मविआला काहीच मिळाले नाही," असे त्यांनी सांगितले. काँग्रेसचे नाना पटोले यांनीही हा मुद्दा उचलला. "सत्ताधाऱ्यांनी समित्यांचे वाटप करताना लोकशाहीचा विचार केला नाही. हे अधिवेशनच जनतेच्या प्रश्नांपासून दूर राहिले," अशी टीका त्यांनी केली.

महायुतीच्या नेत्यांनी मात्र या वाटपाचे समर्थन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "सर्व समित्या सक्षम नेत्यांकडे दिल्या आहेत. आमचे सरकार प्रगती सरकार आहे आणि या समित्या विकासाला गती देतील." अजित पवार यांनीही आपल्या समितीच्या जबाबदारीबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिली. "माजी सदस्यांचे निवृत्ती वेतन हा संवेदनशील मुद्दा आहे. त्यावर योग्य निर्णय घेतले जातील," असे त्यांनी नमूद केले.

या समित्यांच्या घोषणेमुळे अधिवेशन संपल्यानंतरही राजकीय चर्चांना उधाण आले आहे. रवी राणा यांच्यासारख्या वादग्रस्त नेत्याला आश्वासन समिती मिळाल्याने विरोधकांनी भुवया उंचावल्या आहेत. दुसरीकडे, विजय वडेट्टीवार यांच्याकडे लोकलेखा समिती असल्याने सरकारच्या आर्थिक निर्णयांवर विरोधकांचा दबाव राहील, अशी शक्यता आहे. या समित्या आता आपापल्या क्षेत्रात कामाला लागतील आणि त्यांच्या कामगिरीवरून महायुती आणि मविआ यांच्यातील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

या घोषणेमुळे महायुतीने आपले वर्चस्व दाखवले असले, तरी विरोधकांनीही काही प्रमाणात आपली उपस्थिती दर्शवली आहे. आगामी काळात या समित्यांच्या कामकाजातून राज्याच्या राजकारणाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**प्रमुख समित्यांचे वाटप**

नियम समिती: विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांची नियम समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती झाली आहे. सभागृहाच्या नियमांचे पालन आणि सुधारणांवर ही समिती लक्ष ठेवणार आहे.

- विशेषाधिकार समिती: शिवसेना (शिंदे गट) चे नरेंद्र भोंडेकर यांच्याकडे विशेषाधिकार समितीचे प्रमुखपद देण्यात आले आहे. आमदारांच्या विशेषाधिकारांचे संरक्षण ही त्यांची मुख्य जबाबदारी असेल.
- सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समिती: नवनिर्वाचित उपाध्यक्ष अण्णा बनसोडे (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
- आमदार निवास व्यवस्थापन समिती: भाजपचे शिवेंद्रराजे भोसले यांना आमदारांच्या निवास व्यवस्थेची जबाबदारी मिळाली आहे.
- धर्मादाय खासगी रुग्णालय तपासणी समिती: भाजपचेच आशिष जयस्वाल यांच्याकडे ही समिती असेल, जी खासगी रुग्णालयांच्या कामकाजावर नजर ठेवेल.
- लोकलेखा समिती: काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांची या महत्त्वाच्या समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती झाली आहे, जी सरकारच्या खर्चावर लक्ष ठेवते.
- आहार व्यवस्था समिती: शिवसेना (शिंदे गट) चे बालाजी किणीकर यांच्याकडे ही जबाबदारी आहे.
- आश्वासन समिती: भाजपचे रवी राणा यांना आश्वासन समितीचे प्रमुखपद मिळाले असून, सरकारने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता ते तपासतील.
- सदस्य अनुपस्थिती समिती: भाजपचे डॉ. किरण लहामटे यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
- अशासकीय विधेयके आणि ठराव समिती: राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे चंद्रदीप नरके यांच्याकडे ही समिती असेल.

## पंतप्रधान 30 मार्चला नागपूर दौऱ्यावर

### रेशीमबागेतील स्मृती मंदिराला भेट देणार

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 30 मार्च रोजी नागपूर दौऱ्यावर येणार असल्याची माहिती समोर आली आहे. या दौऱ्यादरम्यान ते रेशीमबाग येथील स्मृती मंदिराला भेट देणार आहेत. या भेटीमुळे नागपूर शहरातील राजकीय वातावरणात उत्साह संचारला असून, प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. पंतप्रधानांच्या या दौऱ्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) आमदारांचे नियोजित शिबिर रद्द करण्यात आले आहे, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली.

पंतप्रधानांचा हा दौरा गुढीपाडव्यासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या दिवशी होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रेशीमबागेतील स्मृती मंदिर हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे स्मारक असून, या भेटीतून भाजप आणि आरएसएस यांच्यातील वैचारिक बांधिलकी अधोरेखित होण्याची शक्यता आहे. सूत्रांनुसार, मोदी येथे संघ कार्यालयालाही भेट देण्याची शक्यता आहे, तसेच दीक्षाभूमीला अभिवादन करण्याचा त्यांचा मानस आहे.

या दौऱ्यामुळे भाजपच्या आमदारांचे नियोजित शिबिर रद्द झाले असून, पक्षातील नेत्यांनी याला प्राधान्य दिले आहे. "पंतप्रधानांचा दौरा हा पक्षासाठी आणि नागपूरसाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे शिबिर पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला," असे एका भाजप नेत्याने सांगितले. प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने कडक उपाययोजना सुरू केल्या असून, नागरिकांमध्येही उत्सुकता आहे. या भेटीतून विकास प्रकल्पांचे उद्घाटन किंवा घोषणा होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

# स्टेशनवर कन्फर्म तिकीटवाल्यांनाच एंट्री

## गर्दी टाळण्यासाठी उपाययोजना

**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत माहिती देताना रेल्वे सेवेसंदर्भात घेण्यात आलेल्या महत्त्वाच्या निर्णयाबद्दल सांगितले. रेल्वे स्टेशन म्हणजे गर्दीचं ठिकाण हे सांगायला कुठल्या ज्योतिषाची गरज नाही. त्यातच, महानगर, मेट्रो सिटीतील रेल्वे स्थानकांवर जत्रा, यात्रा, उन्हाळी सुट्टी, दिवाळी सुट्टी आणि इतर सुट्टीच्या हंगामात मोठी गर्दी असते. अनेकदा रेल्वे स्थानकावरील ही गर्दी चेंगराचेंगरीचे कारणही बनते. रेल्वे स्थानकावरील या गर्दीला आटोक्यात आणण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये, मोठ्या आकाराचे फुटवेअर ब्रीज, सीसीटीव्ही आणि वॉर रुम यांसारख्या व्यवस्था करण्यात आल्या आहेत. तर, देशातील ६० रेल्वे स्थानकांवर केवळ कन्फर्म तिकीट असलेल्यांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. वेटिंग लिस्ट आणि विनातिकीट प्रवाशांना स्टेशनच्या बाहेरच प्रतिक्षा रुममध्ये थांबावे लागणार आहे.

रेल्वे स्थानकावरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी रेल्वेनं मर्यादीत प्रवेश नियंत्रण प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीनुसार स्टेशनच्याबाहेर होल्डिंग म्हणजेच वेटिंग रुम सुरू करण्यात येईल. त्यामध्ये, ट्रेन प्लॅटफॉर्मवर येईपर्यंत प्रवाशांना बसवून ठेवण्यात येणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, २०२४ च्या सणासुदीच्या काळात सूरत, उधणा, पाटणा आणि नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर असे होल्डींग एरिया तयार करण्यात आले आहेत. महाकुंभच्या दरम्यान प्रयागराजमधील ९ स्थानकांवर देखील ही व्यवस्था उभारण्यात आली होती. या अनुभवाच्या आधारे देशभरातील ६० रेल्वे स्थानकांवर कायमस्वरुपीचा वेटींग एरिया असणार आहे.

देशातील ६० रेल्वे स्थानकांवर पूर्ण प्रवेश नियंत्रण लागू करण्यात येईल. त्यामुळे, केवळ कन्फर्म रिझर्व्हेशन तिकीट असणाऱ्यांनाच येथे प्रवेश दिला जाईल. वेटिंग लीस्ट आणि बिनतिकीट प्रवाशांना बाहेरील प्रतिक्षा क्षेत्र म्हणजेच होल्डिंग एरियातच वाट पाहावी लागेल. अनाधिकृत प्रवेशद्वारांना देखील बंद केला जाईल, असे रेल्वेमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

**सीसीटीव्हींची संख्या वाढवणार**

रेल्वे स्टेशनवरील प्रवाशांची सुरक्षा वाढविण्यासाठी, रात्रीच्या वेळेसही प्रवाशांना सुरक्षा मिळावी, त्यांना भीती वाटू नये म्हणून रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. नव्या डिझाईनचे १२ मीटर आणि ६ मीटर लांब एफबीओ बनविण्यात येत आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी त्यांची मदत होणार आहे. तसेच, सर्वच प्रमुख रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्हींच्या संख्येत वाढ केली जाईल, अशीही माहिती रेल्वेमंत्र्यांनी दिली.

# ओला-उबरच्या मक्तेदारीला आव्हान!

## सरकार सुरू करणार सहकारी टॅक्सी सेवा

**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

देशातील मोठ्या शहरांमध्ये राहणारे काम करणारे व्यावसायिक ओला-उबेरचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. कॅब ॲग्रीगेटर म्हणून सुरुवात झालेल्या या कंपन्यांनी हळूहळू त्यांची बाजारपेठ बाईक, ऑटो आणि आता ई-रिक्षा बुकिंगपर्यंत वाढवली आहे. पण या कंपन्या जितक्या जास्त विस्तारल्या, तितक्या जास्त सेवा त्यांनी जोडल्या, तितक्या जास्त तक्रारी येऊ लागल्या. तसेच, या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कंपन्यांकडून सतत पावलेही उचलली जात होती. पण आता



सरकारने एक मोठी घोषणा केली आहे. या विभागाला आणि या विभागाच्या बाजाराला लक्षात घेऊन, मोदी सरकारने सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा म्हणाले की, ओला-उबेरच्या धर्तीवर सहकारी टॅक्सी सेवा सुरू केली जाईल. अमित शहा यांनी लोकसभेत भाषण करताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'सहकारातून समृद्धी' ही केवळ घोषणा नव्हे तर ते प्रत्यक्षात आणण्यासाठी गेल्या साडेतीन वर्षांपासून अथक प्रयत्न केले जात आहेत.

ते पुढे म्हणाले की, सरकार येत्या काही महिन्यांत लवकरच ओला-उबेर सारखे सहकारी टॅक्सी प्लॅटफॉर्म सुरू करणार आहे. या प्लॅटफॉर्मवर दुचाकी, रिक्षा आणि चारचाकी वाहनांची नोंदणी देखील केली जाईल. त्यांनी पुढे सांगितले की त्याचा नफा श्रीमंतांच्या हातात जाणार नाही... तर थेट ड्रायव्हरकडे जाईल.

## उद्धव ठाकरे हे आधुनिक जगातले औरंगजेब - नरेश म्हस्केंची टीका

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

स्टॅंड अप कॉमेडिअन कुणाल कामराच्या विडंबन गीतामुळे राज्यात पुन्हा एकदा उद्धव ठाकरेशिवसेना आणि एकनाथ शिंदे शिवसेना वाद सुरु झाला आहे. उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेत कामरा चुकीचे काही बोलला नसल्याचे म्हणत त्याला पाठिंबा दिला आहे. तसेच अधिवेशनात देशाला उत्तम गाणे मिळाल्याचे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला लगावला होता. यावर आता शिंदे गटाची जहरी प्रतिक्रिया आली आहे.

उद्धव ठाकरे हे आधुनिक जगातले औरंगजेब आहेत अशी गंभीर टीका शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी केली आहे. बाळासाहेबांना शेवटच्या दिवसांत त्यांनी किती त्रास दिला हे सगळ्यांना माहित आहे. राज ठाकरे त्याबाबत अनेकदा बोलले आहेत. औरंगजेबाने सत्तेसाठी आपल्या भावांचा काटा काढला. उध्दव ठाकरे यांनी वेगळे काय केले ? असा सवाल म्हस्के यांनी उपस्थित केला. तसेच ठाकरेंनी आपल्या सख्ख्या भावांना पद्धतशीरपणे दूर केले. बाळासाहेबांची वैचारिक संपत्ती त्यांनी सोडली. पण इतर प्रॉपर्टीसाठी भावासोबत दावा मांडला. हा दावा कोर्टात गेला. बाळासाहेबांना अखेरच्या दिवसांत त्यांनी त्रास दिलाच, पण त्यांच्या निधनानंतर शिवसेनेच्या दुष्मनांशी हातमिळवणी करून आताही यातना देत आहेत. जे भावाचे नाही झाले, ते जनतेचे काय होणार? असा टोला म्हस्के यांनी लगावला.




## महत्त्वाचे

### अभिनेता हितेश भारद्वाज, राची शर्मा 'आमी डाकिनी' मध्ये झळकणार

**नाशिक ।** 'आहट' या प्रसिद्ध हॉरर मालिकेशी





परिचय करून देणारी सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन ही वाहिनी आता 'आमी डाकिनी' या नवीन हॉरर शो सह या प्रकाराची नवीन व्याख्या करण्यास सज्ज आहे. कोलकाताच्या सुंदर आणि झपाटलेल्या पार्श्वभूमीवर बेतलेल्या या नवीन मालिकेच्या वेधक कथानकात रहस्य, नाट्य आणि भुताटकीचे घटक असतील. या थरारक कथानकाच्या केंद्रस्थानी अयान रॉय चौधरी आणि मीरा घोष या दोन व्यक्तिरेखा आहेत, ज्या अनुक्रमे हितेश भारद्वाज आणि राची शर्मा यांनी साकारल्या आहेत. अयानचा भूतप्रेतावर विश्वास नसतो पण त्याच्या जीवनावरच एका सूडाने पेटलेल्या आत्म्याचे सावट येते. मीरा एक भाबडी पण निडर मुलगी आहे, जिला कुटुंबाच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे असे वाटते. या मालिकेत आपण भूमिका करत असल्याची पुष्टी करताना हितेश भारद्वाज उत्साहाने सांगतो, "अयान ही व्यक्तिरेखा मी यापूर्वी साकारलेल्या भूमिकांपेक्षा अगदी वेगळी आहे. कथेतील भय तत्त्व आणि भावनांची खोली यामुळे प्रेक्षकांना ही व्यक्तिरेखा वेधक वाटेल. अयान आणि मीरा यांच्या नातेसंबंधांची सुरुवात अनपेक्षितपणे होते. कथा पुढे सरकताना त्यांच्या नात्याची कसोटी अगदी वेगळ्याच, अनपेक्षित घटनांमधून होते. ही भूमिका तीव्र भावनांचा आणि समाधानाचा अनुभव देणारी आहे. प्रेक्षकांपर्यंत ही मालिका कधी पोहोचते असे मला झाले आहे!" आपल्या भूमिकेबद्दल सांगताना राची शर्मा म्हणते, "मीराच्या निरागसतेमुळे या हॉरर मालिकेत तिची व्यक्तिरेखा एकदम टवटवीत वाटते. ती काही संकटात सापडलेली स्त्री नाही. ती आव्हानांचा हिंमतीने सामना करणारी मुलगी आहे. मीरा आणि अयान यांची व्यक्तिमत्त्वे अगदी एकमेकांच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे त्या दोघांमध्ये खूप अनपेक्षित क्षण उभे राहतात. ही व्यक्तिरेखा पडद्यावर साकारताना मला मजा येत आहे. ही मालिका प्रेक्षकांना नक्की आवडेल अशी मला अपेक्षा आहे." भयावह सेटिंग, उत्तम परफॉर्मन्स आणि प्रेम व सूडाची झपाटणारी कथा यांच्यासह 'आमी डाकिनी' प्रेक्षकांची उत्कंठा सतत वाढवत ठेवेल.

### रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी ६.९२ कोटी होणार खर्च

**नाशिक ।** पावसाळात रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांमुळे राज्य शासनाने महत्त्वाचे मार्ग सिमेंट कॉंक्रीटचे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच धर्तीवर नाशिक महापालिकेकडूनही काही रस्ते सिमेंट कॉंक्रीटच्या करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिडको विभागातील महाराणा प्रताप चौक ते बडदेनगर व पुढे डेक्कन पेट्रोल पंप या दरम्यानच्या डांबरी रस्त्याचे कॉंक्रिटीकरण केले जाणार आहे. यासाठी स्थायी समितीने ६.९२ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली. दरवर्षी महापालिकेकडून रस्त्यांवर करोडो रुपये खर्च केले जात असतात; मात्र रस्त्यांची गुणवत्ता हसाते पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडतात त्यामुळे आता महापालिकेने सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. डांबरी रस्त्यांवर कॉंग्रेसचा थर देऊन व्हाईट टॉपिंग केले जाणार असल्याचे संबंधितांनी सांगितले. प्रभाग क्रमांक २४ मधील मानाप्रताप चौक ते भरदे नगर पेट्रोल पंप येथे पहिल्या टप्प्यात टपिंग केले जाणार आहे. त्याचप्रमाणे इतर विभागातील काही रस्त्यांचा यामध्ये समावेश असून ते रस्ते ही सिमेंट कॉंक्रीटचे केले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### गंगाधरी येथे ५ एप्रिलपासून अखंड हरिनाम सप्ताह

**नाशिक ।** हनुमान जन्मोत्सव व श्रीराम



नवमीच्या निमित्ताने नांदगाव तालुक्यातील गंगाधरी येथील मारुती मंदिरामध्ये ५ ते १२एप्रिल २०२५ पर्यंत (रौप्य महोत्सवी वर्ष) अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहामध्ये काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण,हरिपाठ व हरिकीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. सप्ताहात हभप सौ. सीमाताई बेंडके खिर्डीकर, नंदू महाराज भालुरकर, वसंत महाराज डोमाडे, वाल्मीक महाराज गीते, आनंदा महाराज सोमठाणेकर, शनि भक्त सुखदेव महाराज वाकीकर, शिवाजी महाराज तळेकर, संजय महाराज दुकळे, सागर महाराज शास्त्री भालेराव या नामवंत किर्तनकारांची किर्तनसेवा होणार आहे. ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठाचे नेतृत्व ह भ प अंबादास कदम माऊली व हभप हरिभाऊ जाधव करणार आहेत. पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीतर्फे माजी सरपंच संजय सोमासे, समिती अध्यक्ष सुभाष जाधव, उपाध्यक्ष गंगाधर बागुल यांनी केले आहे.

# ॲडव्हान्सड प्रोफेशनल डेव्हलपमेंट प्रोग्राम फॉर सिनिअर फॅकल्टी-लेवल तीन कार्यशाळा

## आरोग्य सेवेत डिजिटल हेल्थमुळे भविष्यात मोठे बदल : विभागीय आयुक्त






**नाशिक ।** आरोग्य क्षेत्रात डिजिटल हेल्थ या संरचनेमुळे भविष्यात मोठे बदल होणे अपेक्षीत असून, सर्वसामान्यांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध होऊ शकते, असे प्रतिपादन नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत ॲडव्हान्सड प्रोफेशनल डेव्हलपमेंट प्रोग्राम फॉर सिनिअर फॅकल्टी-लेवल तीन या कार्यशाळेचे उदघाटन गेडाम यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर, प्रति-कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी बोधिकिरण सोनकांबळे, डॉ. पायल बन्सल आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी गेडाम यांनी सांगितले की, डिजिटल हेल्थ या संकल्पनेने आरोग्य सेवा क्षेत्र अधिक कार्यक्षम होण्यासाठी महत्वपूर्ण ठरणारे आहे. भारतात डिजिटल हेल्थचा वापर वाढत आहे, विशेषतः कोविड कालावधीत वापरण्यात आलेले विविध ॲप्स टेलिमेडिसिन, हेल्थ ॲप्स, आणि इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञामुळे आरोग्यसेवेला नवे परीमाण लाभले आहे. आयुष्मान भारत या केंद्र सरकारच्या संकल्पनेतून डिजिटल मिशनची सुरुवात करण्यात आली आहे. ज्यामध्ये डिजिटल हेल्थ आयडी आणि हेल्थ इन्फॉर्मेशन एक्सचेंजचा समावेश आहे. हे उपक्रम रुग्णांच्या आरोग्य विषयक माहितीचे सुरक्षित डिजिटलीकरण करण्यासाठी वापरले जाते असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आभा कार्ड हे भारताच्या डिजिटल हेल्थ मिशनच्या वाटचालीतील क्रांतीकारक पाऊल आहे. आभा कार्ड ही भारत सरकारची डिजिटल हेल्थ आयाडी प्रणाली आहे, ज्याचा नागरिकांना त्यांचा आरोग्य डेटा सुरक्षितपणे ठेवण्यास मदत करत आहे. आधार कार्डासारख्या संरचना असलेल्या आभा कार्डमुळे देशातील प्रत्येक नागरिकांची आरोग्यविषयक माहिती उपलब्ध होऊ शकते. भारतासारख्या मोठया लोकसंख्या असलेल्या देशात नाम साधर्म्य असलेले असंख्य लोक आहेत; मात्र दोन सारखी नावे असलेल्या लोकांचे आरोग्य कधीच एकसमान असू शकणार नाही. यासाठीच प्रत्येक नागरिकाचे स्वतंत्र आभा कार्ड असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी कुलगुरु माधुरी कानिटकर यांनी सांगितले की, आरोग्य विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्सतर्फे फॅक्लटी डेव्हल्पमेंट अकॅडमी सुरु करण्यात आले असून, त्यात चार टप्प्यावर प्रशिक्षण दिले जाते. तृतीय ॲडव्हान्सड प्रोफेशनल डेव्हलपमेंट प्रोग्राम टप्प्यावर हा आरोग्य शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या वरीष्ठ शिक्षकांसाठी ठेवण्यात आलेला आहे. त्या पुढे म्हणाल्या की, विद्यापीठातर्फे संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यशाळा राबविण्यात येतात. जेणेकरुन संशोधनाला नवी दिशा मिळेल. वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आरोग्य आदी विषयावर भरीव काम करणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

आरोग्य शिक्षण क्षेत्रात मोठया प्रमाणात प्रगती होत आहे. यासाठी वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा शोध आपल्या देशातही होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पालवे तसेच आभार प्रदर्शन डॉ. गौरंग बक्षी यांनी केले.

# भारतीय रेल्वे प्रशासनाची दक्षता

**हत्ती आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी रेल्वे रुळांवर केले नाविन्यपूर्ण उपाय**- भारतीय रेल्वे प्रवशाच्या सुविधा, सुरक्षितेसाठी जशी वचनबद्द आहे, त्याच प्रकारे वन्यजीवांना रेल्वे रूळ ओलांडताना त्रास/ इजा होऊ नाही, याची ही काळजी घेत असते. भारतीय रेल्वे





अंतरंग

भैय्यासाहेब कटारे

९८५००६००४०

हत्ती आणि इतर वन्यजीवांच्या संरक्षणासाठी कटिबद्ध आहे. वन्यजीवांचे रक्षण व्हावे यासाठी रेल्वेने पुढीलप्रमाणे विविध संरक्षणात्मक उपाय योजले आहेत. १) एआय-सक्षम घुसखोरी शोध प्रणाली (Intrusion Detection System-IDS): रेल्वे मार्गांवर हत्तींची उपस्थिती शोधण्यासाठी डिस्ट्रीब्युटेड अकूस्टिक सेन्सर्स (DAS) वापरणारी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये ऑप्टिकल फायबर, हार्डवेअर आणि हत्तींच्या हालचालींसाठी पूर्व स्थापित सिग्नेचर समाविष्ट आहेत. ही प्रणाली लोको पायलट, स्टेशन मास्टर आणि नियंत्रण कक्षाला हत्तींच्या हालचाली बाबत सतर्क करते, जेणे करून वेळेत प्रतिबंधात्मक उपाय करता येतील. सध्या ही प्रणाली ईशान्य सीमांत रेल्वेच्या १४१ कि.मी. लांबीवर कार्यरत आहे आणि हत्तींचे संरक्षण करण्यात प्रभावी ठरली आहे. एकूण ११५८ कि.मी. लांबीच्या संवेदनशील मार्गांवर ही प्रणाली बसवण्याचे काम सुरू असून, त्यासाठी २०८ कोटी रुपये खर्च मंजूर करण्यात आला आहे. २) हत्तींच्या धडकेत त्वरित कारवाई: हत्ती आणि रेल्वे अपघात झाल्यास झोनल रेल्वे आणि वनविभाग संयुक्त चौकशी करतात. आवश्यकतेनुसार, वेग मर्यादा लागू केल्या जातात आणि ट्रेनचालकांना तसेच स्टेशन मास्टरांना सतर्क केले जाते. नियमित बैठका घेऊन रेल्वे कर्मचारी आणि वन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. ३) हत्तींच्या हालचालीसाठी भुयारी मार्ग आणि रॅम्पचे बांधकाम. ४) रेल्वे रुळांच्या बाजूने कुंपण उभारणी. ५) हत्तींच्या मार्गांवर सूचना फलक बसवणे, जेणेकरून लोको पायलटांना पूर्वसूचना मिळेल. ६) रेल्वे मार्गावरील गवत आणि खाद्य पदार्थ हटवणे. ७) वन क्षेत्रात सौर ऊर्जेवर चालणाऱ्या एलईडी दिव्यांची व्यवस्था. ८) वन विभागाने हत्ती ट्रॅकर्स नेमले असून, ते स्टेशन मास्टर व लोको पायलटांना वेळेवर सतर्क करतात. ९) रेल्वे मार्गा जवळ हत्तींच्या हालचाली रोखण्यासाठी 'हनी बी बझर' (Honey Bee Buzzer) बसविण्यात आले आहेत, ज्याचा आवाज हत्तींसाठी प्रतिबंधक ठरतो. १०) थर्मल व्हिजन कॅमेऱ्यांचा वापर करून रात्री किंवा कमी दृश्य मानतेच्या परिस्थितीत हत्ती आणि वन्यप्राण्यांची उपस्थिती ओळखण्याचे प्रयोग सुरू आहेत. या उपायांमुळे हत्तींच्या मृत्यूचे प्रमाण २०१३ मध्ये २६ वरून २०२४ मध्ये १२ वर आले आहे, म्हणजेच ५०% पेक्षा अधिक घट झाली आहे.

## प्रा. गंगाधर अहिरे यांच्या काव्यसंग्रहावर चिंतनात्मक चर्चा

**नाशिक ।** प्रसिद्ध कवी प्रा. गंगाधर अहिरे यांचा अलिकडेच 'आम्ही लोक आणि हिंस्त्र कळपांच्या कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. समकालीन सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय स्थितीगतीवर मर्मज्ञ भाष्य असलेला हा संग्रह अल्पावधीतच साहित्य वर्तुळात लोकप्रिय झाला. त्यामुळेच सदर संग्रहातील कवितांवर दि. २९ मार्च रोजी चिंतनात्मक चर्चेचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चेच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी, लेखक व नाट्य दिग्दर्शक रवींद्र लाखे असणार आहेत. जेष्ठ कवी अविनाश गायकवाड आणि समाजशील काव्यकारा लक्ष्मी यादव हे प्रस्तुत संग्रहावर भाष्य करणार आहेत. सदर चर्चेचे बीजभाषण लेखक व समीक्षक असलेले अरविंद सुरवाडे करतील. प्रस्तुत संग्रहावर यापूर्वीही मराठी दिनाचे औचित्य साधून, नाशिकरोड येथील म. फुले सार्वजनिक वाचनालयाने साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत विचारमंथन घडविले होते.

प्रस्तुत संग्रहावर होणारी ही दुसरी परिचर्चा आहे. हा समारंभ रोटरी क्लब, सार्वजनिक वाचनालय, शिवाजी चौक, कल्याण येथे होणार आहे. ह्या वैचारिक मंथनात उपस्थित राहण्याचे आवाहन, निमंत्रक असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते काभुराज बोढारे आणि डॉ. त्र्यंबक दुनबळे यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

## शेनीतला गोकुळ जाधव यांचा पशुधनासाठी चाऱ्याच्या मक्याचा यशस्वी प्रयोग



"उन्हाळ्यात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई असते या माध्यमातून चारा लागवड केली आहे. चारा पिकात मक्याला मोठे महत्व आहे. या पिकामुळे दुग्धव्यवसायाला चालना मिळते आहे. शेती व्यवसायामुळे कुटुंबाला समृद्धता मिळत आहे.

**- गोकुळ जाधव, पदवीधर शेतकरी शेनीत**

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यात शेतीला जोड धंदा म्हणून दुग्धव्यवसाय केला जातो. चाऱ्याअभावी दुग्धव्यवसाय संकटात आला असल्याचे चित्र दिसते. पाळलेल्या पशुधनाला पौष्टीक चारा मिळावा या उद्देशाने शेनीत येथील पदवीधर असलेले गोकुळ जाधव यांनी १२ एकरमध्ये जनावरांसाठी चाऱ्याच्या मक्याचा प्रयोग केला आहे.

चाऱ्याच्या मक्यासाठी शेनीत येथील डेयरी फार्म सोबत त्यांनी करार केला आहे. मक्याची उंची १० फूट इतकी झाली आहे. यावर्षी त्यांना २५० ते ३०० टन प्रमाणे ७ ते ८ लाख अपेक्षित उत्पन्न मिळणार असल्याचे त्यानी सांगितले. मका लावल्यानंतर ११० दिवसांनी चाऱ्यासाठी काढणीला येतात. यासाठी रासायनिक खते वापरतात. पिकांमधील सरीचे अंतर दोन फूट तर झाडाचे अंतर ८ इंच इतके ठेवले आहे. मागच्या वर्षी बारा एकरमध्ये टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करून मोठे उत्पन्न त्यांनी घेतले होते. गोकुळ जाधव यांच्या विविध यशोगाथेमुळे त्यांना गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात शासनाचा कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्माचा आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त झाला आहे. आई वडील, त्यांचे मोठे भाऊ प्रवीण जाधव, गोकुळ जाधव यांची पत्नी अर्चना जाधव हेही मेहनत घेत असतात.

# पोलीस आयुक्त आपल्या दारी उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**नाशिक ।** राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने "पोलीस आयुक्त आपल्या दारी" हा उपक्रम नाशिक शहरात यशस्वीपणे राबविण्यात आला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम २६ मार्च २०२५ रोजी नाशिक शहरातील विविध भागांमध्ये पार पडला. या उपक्रमांतर्गत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांना थेट भेटून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि तत्काळ उपाययोजनांचे आश्वासन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ जानेवारी २०२५ रोजी राज्यभरातील वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची माहिती दिली. या आराखड्यात प्रशासनातील विविध सुधारणा व नागरिकांच्या सोयीसाठी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून "पोलीस आयुक्त आपल्या दारी" हा उपक्रम राबविण्यात आला.

उद्योग क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी एमआयडीसी, चुंचाळे पोलीस चौकी येथे भेट दिली. यावेळी आयमा व निमा संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध उद्योजक उपस्थित होते. उद्योजकांनी त्यांच्यासमोर असलेल्या समस्या पोलीस आयुक्तांसमोर मांडल्या. उद्योग क्षेत्राला त्रास देणाऱ्यांविरोधात तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी शहरभर सीसीटीव्ही यंत्रणा बसवली जाणार असून, एमआयडीसी परिसरातही उद्योजकांनी पुढाकार घेऊन सीसीटीव्ही बसवावेत, असे आवाहन पोलीस आयुक्तांनी केले.

### शहरातील विविध भागांमध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या भेटी

शहरातील अनेक ठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकारी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पोहोचले. नागरिकांशी संवाद साधला. समस्या, अडचणी जाणून घेतल्या.पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा प्रशांत बच्छाव- त्रिकोणी गार्डन, भद्रकाली. पोलीस उपायुक्त परिमंडळ १ किरणकुमार चव्हाण- सराफ बाजार, सरकारवाडा पोलीस उपायुक्त परिमंडळ २ मोनिका राऊत- डीजीपी नगर, उपनगर. पोलीस उपायुक्त मुख्यालय चंद्रकांत खांडवी- कलानगर, म्हसरूळ सायक पोलीस आयुक्त पद्मजा बढे- फुलेनगर, पंचवटी, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव- विनयनगर, मुंबई नाका, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख- रेणुका माता मंदिर, अंबड, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बारी- सामनगाव, नाशिकरोड, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके- कॉलेजरोड, गंगापूर, सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता निकम- शिवाजी चौक, भगूर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक इरफान शेख- हृदयोश्वर महादेव मंदिर, सातपूर, या उपक्रमाद्वारे नागरिकांना थेट वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोर त्यांच्या तक्रारी मांडण्याची संधी मिळाली. अनेक भागांमध्ये नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि पुढेही असे उपक्रम राबवावेत अशी मागणी केली. "पोलीस आयुक्त आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच उद्योग व व्यावसायिक क्षेत्रातील अडचणी सोडवण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णतः कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले. नाशिककरांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला असून, पोलीस दलाच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

> महत्त्वाचे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**नाशिक ।** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना या योजेनंतर्गत अर्ज करण्यासाठी २९ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आहे, अशी माहिती समाज कल्याण नाशिकचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगांवकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करणाऱ्या परंतु अर्जाची प्रत कार्यालयात अद्याप जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांनही आवश्यक कागदपत्रांसह अर्जाची प्रत कार्यालयात त्वरीत सादर करावी. तसेच विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर लॉग इन करून त्यांच्या अर्ज त्रूटी पूर्ततेसाठी SENT BACK केलेला असल्यास २९ मार्च २०२५ पर्यंत त्रूटींची पुर्तता करून अर्जाची प्रत कार्यालायत सादर करावी, असे आवाहनही सहाय्यक आयुक्त नांदगांवकर यांनी केले आहे.

## जिल्हा बँकेने ओटीएस योजना राबवावी : भगरे

**नाशिक ।** नोटाबंदीनंतर आर्थिक अडचणीत सापडलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सक्तीची कर्जवसुली थांबवावी तसेच वन टाइम सेटलमेंट (ओटीएस योजना) राबवण्याची मागणी दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्कर भगरे यांनी संसदेत केली. भगरे यांनी त्रिभुवन सहकारी विश्व विद्यापीठ विधेयक, राज्यातील सहकारी साखर कारखान्याच्या अडचणी, नाशिक जिल्हा बँकेची स्थिती या प्रकरणी कर्जवसुलीचे प्रश्न उपस्थित करत शेतकऱ्यांची कैफियत मांडली. राज्यातील ४८ टक्के कृषी संस्था अडचणीत सापडल्या आहेत. नाशिक जिल्हा बँक नोट बंदीपासून अडचणीत आली आहे. अवकाळी पाऊस, पिकांना भाव नाही. उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे शेतकरी कर्ज भरू शकले नाही. सरकारने कर्जमाफीच्या घोषणा केल्या. मात्र कर्जमाफी न केल्याने बँक सक्तीची कर्जवसुली करत आहे. सातबारा उताऱ्यावर बोजा चढवत आहे. ती करत असलेली प्रक्रिया थांबवावी व राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे एकरकमी कर्जवसुली योजना राबवावी, अशी मागणी खा. भगरे यांनी केली आहे.

## निमा हाऊसमध्ये सोमवारी चर्चासत्र

**नाशिक ।** नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) सातत्याने देश विदेशातील व्यवसायाच्या संधी नाशिकचे उद्योजक तथा व्यापाऱ्यांसाठी उपलब्ध करून देत असते. जागतिक बाजारपेठेत आपल्या उत्पादनास ग्राहक मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून व्हिएतनामचे व्यापार प्रतिनिधी ले ट्रांग खा हे निमा हाऊस, सातपूर येथे भेट देत असून, पुरवठादारांसोबत व्यापारसंधीचा शोध घेण्यासाठी २९ मार्च ते १ एप्रिल दरम्यान इच्छुक लघु, मध्यम व मोठे उद्योगांना भेट देणार आहेत. चारही दिवसात जिल्ह्यातील आपल्या उद्योगांना भेटीसाठी आपण विमान संपर्क साधून नोंदणी करू शकतात, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अमृतवन उद्यानात समाजकंटकांकडून नासधूस

**नाशिक ।** मखमलाबाद परिसरातील तवली टेकडीवरील अमृतवन उद्यानात मंगळवारी मध्यरात्री काही समाजकंटकांकडून उद्यानातील लॉन्स, झाडे तसेच पाईपलाईनचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आल्याचा प्रकार घडला. पोलिसांनी समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उद्यानप्रेमी नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, याबाबत म्हसरूळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे अमृतवाणी उद्यानातील हिरवळ, चाफ्याच्या झाडाच्या फांद्या, पाणी देण्यात येणारे ड्रीपचे पाईप तोडले असून, इतर गोष्टींची मोठ्या प्रमाणात नासधूस केली आहे. बुधवारी सकाळी हा प्रकार कर्मचाऱ्यांच्या लक्षात आला. त्यानंतर तेथे फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांनी या नासधूस प्रकरणी तीव्र संताप व्यक्त करीत या समाजकंटकांना कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरणात प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## शासकीय वसतिगृहाकरिता भाडेतत्वावर हवी इमारत

**नाशिक ।** सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुका येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहाकरीता २२५ विद्यार्थी क्षमता असलेली भाडेतत्वावर इमारतीची आवश्यकता आहे. इच्छुक इमारत मालकांनी १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह गृहपाल, आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह(नवीन), पालखेड रोड दिंडोरी यांच्याशी अथवा प्रकल्प कार्यालय नाशिक येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिकचे प्रकल्प अधिकारी अर्पित चौहान यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# भूखंड हडपण्यासाठीच एका प्रतिथयश बिल्डरकडून कुटील कारस्थान

### मृत व्यक्तीच्या कुटुंबाच्या चौकशीची मागणी । गुन्हा दाखल न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**नाशिक ।** पाथर्डी शिवारातील भोलेनाथ गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कात मुक्त व्यक्तीचे नाव लावल्या प्रकरणी महसूल यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. या सर्व कारस्थानाचा मास्टरमाईंड शहरातील एक नामचीन बिल्डर असून, संस्थेच्या मालकीचे भूखंड हडपण्यासाठीच महसूल यंत्रणेला हाताशी धरून त्याने हे षडयंत्र रचल्याचे बोलले जाते. मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला हाताशी धरून त्याने अर्ज फाटे केल्याचा संशय सभासदांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणावरून महसूल खात्याची पूरती बदनामी झाली असून, अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा संशय व्यक्त केला जात आहे. पाथर्डी शिवारातील भोलेनाथ गृहनिर्माण संस्थेचे तब्बल ३५ भूखंड असून ही मिळकत भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी चीफ प्रमोटर दिवंगत माधव सखाराम डामसे यांनी खरेदी केलेली आहे. यातील भागधारकांनी एकत्रित त्या जमा केलेल्या रकमेमधूनही मिळकत खरेदी करण्यात आलेली आहे. सदर मिळकत आदिवासी असून खरेदीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन त्यावर प्लॉटिंग करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात माधव सखाराम डामसे हे मृत पावल्यावर ही मिळकत गिळंकृत करण्याच्या उद्देशाने संबंधित 'साईच्या सहारा' खाली असलेल्या बिल्डरने महसूल यंत्रणेला हाताशी धरत मिळकतीच्या मालकी सदरातील संस्थेचे नाव वगळून मृत माधव सखाराम डामसे यांचे नाव लावण्याचे षडयंत्र रचले.




यामध्ये माधव डामसे यांच्या कुटुंबातील एका सदस्याचा थेट संबंध असल्याचा संशय घेतला जात आहे. त्यामुळे माधव डामसे मृत पावल्यावर लगेच दोन महिन्यांनी तहसील कार्यालयात संस्थेच्या मालकी हक्कात नाव लावण्या संदर्भात तहसीलदार कार्यालयात अर्ज दाखल करण्यात आला. तहसीलदार कार्यालयात दाखल अर्जावर तत्कालीन तहसीलदार अनिल दौडे यांनी कारवाई सुरू केली. मात्र त्यानंतर त्यांची बदली झाल्या मुळे प्रकरण थांबले होते. मात्र विद्यमान तहसीलदार डॉ.शोभा पुजारी यांनी सन २०२१ सालच्या अर्जावर मंडळ अधिकारी आणि सहकारी संस्थेचे उपनिबंधक यांचा अहवाल आणि पत्राचा संदर्भ घेऊन संबंधित नाव लावण्याचा अर्जावर शिकमोर्तब केले.हे प्रकरण उघडकीस आल्या नंतरही केलेला आदेश रद्द करण्यासाठी तहसीलदार पुजारी यांनी चालढकल केल्याचे दिसून येते. यावरून या प्रकरणात काही 'अर्थकारण' झाले आहे का? असाही सवाल उपस्थित केला जात आहे.दै महासागरने या प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर महसूल यंत्रणेकडून कुठलीही कारवाई न झाल्यामुळे या प्रकरणातील अर्थकारणाच्या संशयाला बळकटी मिळत आहे.



दरम्यानच्या काळात या सर्व प्रकारांना मागे असलेला भूमाफिया एक बिल्डर आणि संस्थेची संबंध असल्यास एका व्यक्तीचा संबंध असून संस्थेचे भूखंड गिळंकृत करण्यासाठी हे षडयंत्र रचल्याचे बोलले जाते. 'साईंचा सहारा' घेतलेल्या या बिल्डरचे कार्यालय का.का. वाघ महाविद्यालयाच्या परिसरात असून याच बिल्डरने कॉलेज रोडला एका शैक्षणिक संस्थेची जागा विकत घेतली आहे. त्यातही अनियमितता असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हे सर्व संशयित महसूल यंत्रणेला माहीत असतानाही शासनाची फसवणूक केली म्हणून त्यांच्याकडून कुठलीही कायदेशीर कारवाई केली जात नाही. म्हणूनच महसूल यंत्रणा भूमाफीयांच्या हातचे बाहुले असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

याप्रकरणी फौजदारी कारवाई करण्याची मागणी संबंधी संस्थाचालकांनी केली असून मृत माधव सखाराम डामसे यांच्या कुटुंबातील 'त्या' सदस्याची देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. या प्रकरणातील मास्टरमाईंड असल्या तथाकथित बिल्डर विरुद्ध गुन्हा दाखल करावा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा संस्थाचालकांनी दिला आहे.

#### जिल्हाधिकाऱ्यांचा वचक नाही...

या प्रकरणाला तीन महिन्यापूर्वी वाचा फुटून देखील जिल्हाधिकाऱ्यांना कुठलेही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.आपल्या आस्थापनेतील जबाबदार अधिकाऱ्याने इतकी मोठी चूक केल्यानंतरही जिल्हाधिकाऱ्यांनी कुठलीही प्रतिक्रिया किंबहुना कारवाईचे आदेश न दिल्याने जिल्हाधिकाऱ्यांचा महसूल यंत्रणेवर कुठलाही वचक नसल्याचे दिसून येत आहे.

## ग्राहकांचे हक्क वृद्धिंगत करण्यासाठी सामूहिक प्रयत्न : बाबासाहेब पारधे





**नाशिक ।** नागरिक हा ग्राहक आहे. त्यांचे हक्क मिळवून देत ते वृद्धिंगत करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यासाठी सर्व विभागांच्या समन्वयाने प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांनी येथे केले.

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा मंदाकिनी भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त महेश चौधरी, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्या कविता चव्हाण, प्रेरणा महाजन, जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार, धान्य वितरण अधिकारी गणेश जाधव आदी उपस्थित होते. पारधे म्हणाले की, ग्राहकांच्या हक्काबरोबरच प्रत्येकाने ग्राहक कर्तव्य जाणून घेणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभागाच्या माध्यमातून ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ततेसाठी प्रयत्न केले जातील. याबरोबरच ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या समन्वयाने ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती भोसले म्हणाल्या की, ग्राहक हा ग्राहक हक्क संरक्षण कायद्याचा आत्मा आहे. 'शाश्वत जीवनशैलीकडे वाटचाल', अशी यंदाच्या ग्राहक हक्क दिनाची संकल्पना आहे. ग्राहक म्हणून कमीत कमी रसायनांचा समावेश असलेल्या वस्तूंचा वापर वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे शाश्वत जीवनशैलीचा विकास होऊ शकेल. आवश्यकतेनुसार वस्तूंची खरेदी केल्यास पर्यावरण संरक्षणास मदत होईल. राष्ट्रीय ग्राहक परिषदेच्या सदस्या आशा पाटील, ग्राहक पंचायतीचे सदस्य दत्तात्रय शेळके, सचिव विलास देवरे, राजेंद्र जडे यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हा पुरवठा अधिकारी पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मशरूम उद्योजकांसह नवप्रशिक्षणार्थींचा मेळावा संपन्न

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राने प्रशिक्षित केलेल्या मशरूम उद्योजक व नवप्रशिक्षणार्थी यांचा दोन दिवसीय नवप्रशिक्षण तथा व्यवसाय अनुभव आदान प्रदान मेळावा विद्यापीठात संपन्न झाला. त्यात नाशिक जिल्ह्यातील मशरूम उद्योजक व नवप्रशिक्षणार्थी मिळून एकूण ८५ जण सहभागी झाले होते. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते १५ यशस्वी मशरूम उद्योजक यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ७० नवप्रशिक्षणार्थी, ज्यात प्रामुख्याने आदिवासी व महिला प्रशिक्षणार्थी होते, त्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रभारी प्रमुख राजाराम पाटील यांनी मेळाव्यात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. गृहविज्ञान तज्ञ अर्चना देशमुख यांनी या मेळाव्याचे समन्वयन व संयोजन केले.

यावेळी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की मशरूम व्यवसाय हा कमी खर्चात, कमी जागेत व कमी वेळेत हमखास आणि चांगले उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. हॉटेल – पर्यटन व्यवसायाच्या वाढीसोबत घरगुती खाद्यपदार्थ म्हणून देखील मशरूमची मागणी वाढत आहे. त्यामुळे नियमित नोकरी व्यवसायास किंवा शेतीला जोडधंदा म्हणून हा व्यवसाय करता येवू शकतो. त्यामुळे एक समर्थ स्वयंरोजगार म्हणून देखील बेरोजगार तरुण– तरुणी, गृहिणी यांनी या व्यवसायाकडे वळायला हवे असे आवाहन कुलगुरूंनी प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले. यानिमित्ताने मशरूम उद्योजक किरण पवार यांनी मशरूम उत्पादन ते त्याची विक्री व्यवसाय याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. मशरूम उद्योजिका चेतना पवार यांनी उन्हाळ्यात लागवड केल्या जाणाऱ्या मिल्की मशरूम याविषयी माहिती दिली. तसेच मशरूम पासून तयार केले जाणारे सूप, पुलाव, रोल, बिस्कीट, चकली आदी विविध पदार्थ तयार करण्याविषयी मार्गदर्शन केले. मेळावा यशस्वी होण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राचे हेमराज राजपूत, डॉ. शाम पाटील, मंगेश व्यवहारे, डॉ. प्रकाश कदम, श्री. जयंत भोये, संदीप भागवत, हर्षल काळे व ऋषिकेश पवार यांनी परिश्रम घेतले.

## 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' योजनेत १८१ बोगस लाभार्थी; गुन्हा दाखल

### कळवण तालुक्यातील भादवन गावातील प्रकार

**कळवण ।** तालुक्यातील भादवन गावात १८१ बोगस शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेतल्याचा प्रकार समोर आला असून, याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी यांनी कळवण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, की अलीकडच्या काळामध्ये भाजपाचे नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कळवण भागाचा दौरा करून या ठिकाणी काही नागरिकांनी या ठिकाणी बोगस शेतकरी असल्याचे भासवून शासनाच्या पंतप्रधान किसान विमा योजनेचा लाभ घेतल्याची माहिती कृषी अधिकारी, तसेच स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये दिली होती. यानंतर या सर्व प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे. याबाबत कळवणच्या तालुका कृषी अधिकारी मिलन म्हस्के यांनी कळवण पोलीस ठाण्यामध्ये पंतप्रधान किसान विमा योजनेचा सुमारे १८१ बोगस शेतकऱ्यांनी लाभ घेऊन शासनाची २ लाख ९८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले असून, या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये जे आरोपी आहेत, ते प्रथमदर्शनी शेतकरी नसल्याचे समोर आले आहे. या बोगस लाभार्थींनी नावांचे रजिस्ट्रेशन करून मौजे भादवण येथील शेतकरी नसताना तेथीलच रहिवासी असल्याचे भासवून स्वत:च्या बँक खात्यांवर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या पोर्टलवर लॉगइन करून ही खोटी माहिती भरली व त्याआधारे शासनाची फसवणूक केली. त्यामुळे हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. याप्रकरणी कळवण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश बोरसे हे अधिक तपास करीत आहेत.

## एल्गार संघटनेचा पाण्यासाठी ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा

**कावनई ।** इगतपुरी तालुक्यात ग्रामीण भागातील वाड्यापाड्यांना पाणीटंचाई जाणवू लागली आहे. वाळविहिर ग्रामपंचायत हद्दीतील सहा वाड्यांना तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. एल्गार कष्टकरी संघटनेने प्रशासनाला पत्र देऊन या वाड्यांना तात्काळ टँकरने पाणीपुरवठा करावा अशी मागणी केली आहे.

मात्र तालुका प्रशासनाने टँकर सुरू न केल्याने संतप्त झालेल्या महिलांनी एल्गार कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली नुकताच ग्रामपंचायत कार्यालयावर हंडामोर्चा काढला. याबरोबरच महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयातच ठिय्या आंदोलन केले. जोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा होत नाही तोपर्यंत महिला हटणार नाही, अशी आक्रमक भूमिका आंदोलक महिलांनी घेतली होती. दरम्यान




वाळविहिर ग्रामपंचायत हद्दीतील पायरवाडी, खडकवाडी, तळ्याची वाडी, बकुळीचीवाडी, भैरोबाची वाडी या वाड्यांना पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई जाणवत असल्याने महिनाभरापूर्वीच एल्गार कष्टकरी संघटनेने या महिलांच्या मागणीची दखल घेत प्रशासनाला पत्र देऊन टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने केवळ कागदोपत्री घोडे नाचवले. ग्रामस्थ व महिला मात्र पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करीत आहेत. ग्रामसेवक व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी भेट देत महिलांची समजूत काढली. यावेळी आजच्या आज टँकरने पाणीपुरवठा करणार का? असा अधिकार्‍यांना सवाल करून आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या.

आंदोलनात संतोष ठोंबरे, वसंत इरते, गणपत गावंडा, काळू निरगुडे, रामदास सावंत, राजू मेंगाळ, शिवाजी सावंत, संजय पारधी, हनुमंत सराई, वर्षा अवली, सुरेखाताई मधे,मंगलताई खडके, मथुराताई भगत, कविताताई पुंजारे, कविताताई ठोंबरे, काळीबाई भस्मे, सखुबाई ठोंबरे, सखुबाई लचके, शिवराम ठोंबरे, तुळशीराम ठोंबरे, कुंडलिक गांगड आदी सहभागी झाले होते.

नवी दिल्ली येथील उच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींच्या निवासस्थानी आग लागते आणि आग विझविताना चक्क खोली भरून रोख रक्कम सापडते. ही रक्कम चक्क ५० कोटी रुपयांच्या पेक्षा जास्त भरते. सर्वात गंभीर म्हणजे त्यांच्याकडे इतकी प्रचंड कॅश कोठून आली? याची चौकशी करण्याऐवजी त्यांची बदली अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून करण्यात येते. आता अशी रोख रक्कम तर सोडा, फक्त दहा लाख रुपये जरी तुमच्या आमच्या घरात सापडले असते, तर ईडी, इन्कमटॅक्सवाल्यांनी पिसाळलेल्या कुत्र्यासारखं अक्षरशः नोटीसवर नोटीस देऊन लचके तोडले असते. नोटबंदी केल्यावर काळापैसा नष्ट होईल वगैरे रिकामटेकड्या वल्गना करणाऱ्यांच्या थोबाडावर ही सणसणीत चपराक म्हणावी लागेल. आज देशातील बड्या बड्या अधिकाऱ्यांकडे करोडो रुपये किंमतीच्या मालमत्ता आहेत. मुंबई मध्ये तर एका मोठ्या अधिकाऱ्याने खुल्लम खुल्ला ४० कोटी रुपयांचा फ्लॅट विकत घेतला. कोणी त्यांचा एक केस देखील वाकडा करू शकले नाहीत. बोगस आयएएस प्रकरणी अद्यापही कारवाई न होता संबंधितांना सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन देऊन मोकळे केले आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची अशी अवस्था आहे, मग तालुका स्तरावर, जिल्हा पातळीवर काय अवस्था असेल? खरे तर ज्यांची ज्यांची न्यायमूर्ती म्हणून नेमणूक केली जाते, त्यांचे दर पाच वर्षांनी एक परीक्षण होणे जरुरी आहे. त्यांनी दिलेल्या निकालावरूनच त्यांची बौद्धिक कुवत समजून येईल. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वकिलांच्या संघटनेने 'आम्ही काही कचरा कुंडी नाही' असे सणसणीत उत्तर देत सर्वोच्च न्यायालयाला खडे बोल सुनावत अशा भ्रष्ट न्यायमूर्तींना स्वीकारण्यास नकार दिला आहे. देशातल्या सगळ्या वकिलांना आता फुकटचा सल्ला द्यावासा वाटतोय. या वकीलांनी अवांतर कौशल्य शिकून घेतले पाहीजे. त्यात इस्त्री, कल्हई, धोबीकाम, न्हावीकाम, चपला दुरुस्त करणे, टायपिंग करणे, वडापाव भजे तळणे, भेळ बनवणे, इलेक्ट्रिक वस्तू दुरुस्ती, नळ दुरुस्ती, सुतारकाम इत्यादी इत्यादी. कारण तुमच्याकडे येणार कोण आहे मरायला पैसे खर्चायला ? यापुढे कोर्ट आणि न्यायपालिका अस्तित्वातच राहणार नसेल तर तुमच्या धंद्याला विचारतो कोण ? जर कुठल्याही बाबीत कोर्ट कायदा आणि घटना काय सांगते ते न पाहता जनतेच्या पैशाचा विचार करणार असेल तर कोण कशाला मरायला कोर्टात खटले दाखल करेल ? न्याय मिळणार नसेल तर खटले कशाला ? आणि खटले नसतील तर वकिलांचं काय काम ? आणि वकील खटले दोन्हीही नसतील तर कोर्टाचे तरी काय काम ? सगळी कोर्ट बरखास्त करावीत. कोर्टाच्या कर्मचारी वर्गाला सक्तीची निवृत्ती द्यावी. कोर्टाच्या सगळ्या मालमत्ता मोक्याच्या जागेवर आहेत. त्या विकून पैसे उभारावेत. पाहिजेत कशाला कोर्ट कायदे आणि खटले. जी पार्टी सगळ्यात आधी सरकारच्या बाजूला जाईल, जास्त देणगी देईल आणि जास्त मोठ्याने सरकारच्या नावाने जयघोष करेल तिची बाजू योग्य. झाला निकाल. किती सोप्प आहे ना सगळ. म्हणून वकिलांनी काळे कोट खुंटीला टांगावे आणि नव्या पोटापाण्याच्या उद्योगाला लागावे हे उत्तम. खूप दुःख झाल की अशा जजची फक्त बदली करण्यात आली. खरं तर त्यांना तत्काळ पदमुक्त करायला हवं होतं. सामान्य माणूस एव्हाना जेल मधे गेला असता, मग जज का नाही ? डिशप्रपोर्शननेट असेट्स आणि प्रिव्हेन्शन ऑफ करप्शन ॲक्ट ह्या दोन्ही खाली तडतोब घरी बसवायला हवं होतं. त्यांना त्या पदावर राहू देणं अतिशय चुकीचे आहे. देश कायद्यावर चालतो. जर कायदा राखणाऱ्यांनी जर त्याची ऐशी की तैशी केली तर धाक कोणाचा राहणार ? धक्कादायक बाब म्हणजे ही घटना घडली १४ मार्चला आणि उघडकीस इतक्या दिवसांनी आली? अलाहाबाद हाई कोर्टाच्या बार एसोसिएशनने त्यांच्या बदलीवर आक्षेप घेतला आहे की अलाहाबाद हाई कोर्ट काही कचऱ्याचा डब्बा नाही. ह्या पेक्षा अपमान न्याय व्यवस्थेचा आणि काय होऊ शकणार?

# सडलेल्या न्यायव्यस्थेविरुद्ध दाद कोणाकडे मागायची?



स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील लोकशाही हे सुदृढ मानली जायची. यामध्ये न्यायालयाचे स्थान हे उच्च स्थानी होते. परंतु आता न्यायदानाच्या कामात सुद्धा भ्रष्टाचार शिरला की काय? अशी शंका तमाम भारतीयांच्या मनात येत आहे. ज्या देशातील राजकारणीच मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारी आहेत, त्या देशातील न्यायव्यवस्था कशी यापासून दूर राहील? ही विचार करण्याची गोष्ट आहे.

शासकीय यंत्रणेमधील कुठलाच विभाग भ्रष्टाचारापासून अलिप्त नाही. मग ते पोलीस खाते असो की महसूल खाते, कृषी विभाग असो की इतर कुठलाही विभाग. भ्रष्टाचारच हा शिष्टाचार झाल्याचं सगळीकडे दिसते.

नुकतेच सातारा येथील न्यायाधीश धनंजय निकम यांना पाच लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ सापडले. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी कोट्यवधी रुपयांचा साठा सापडला. बीडचे न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांनी त्यांच्याच न्यायालयातील खटल्यातील गुन्हेगारांसह निर्लज्जपणे रंगपंचमी साजरी केली. ज्यामध्ये स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या तपासात हल्गर्जीपणा करणारे निलंबित पोलीस निरीक्षक सुद्धा सहभागी होते.

न्यायदानासारखे पवित्र कार्य करणारे न्यायाधीश जर असे वागत असतील, तर समाजाने नेमके आदर्श घ्यायचे कोणाचे? पैशाने जर न्याय विकला जात असेल तर गरिबांनी न्याय मागायचा कुणाकडे? मागील काही वर्षात राजकीय सत्ताधाऱ्यांचा सर्वच क्षेत्रात हस्तक्षेप वाढला आहे. परंतु न्याय क्षेत्र यापासून दूर होते. आता मात्र ह्या घटना पाहून न्याय क्षेत्र सुद्धा राजकीय सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालचे मांजर तर होत नाही ना? अशी भीती सर्वसामान्यांना वाटत आहे.

सत्तेच्या माध्यमातून साम-दाम-दंड-भेद ही नीती सर्वत्र सुरू झाल्याचे दिसते. त्यामुळेच की काय जो तो आपला जीव वाचवण्यासाठी सत्तेच्या चौकटीत जावून बसतोय. विरोधात जाण्यासाठी कोणीही तयार नाही. खऱ्याला खरं आणि खोट्याला खोटं म्हणणारे राम शास्त्री प्रभूंसारखे न्यायाधीश आता शोधूनही भारतात सापडणार नाही एवढे मात्र नक्की. दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांनी हे प्रकरण त्यांच्या वरिष्ठांना कळवले, ज्यांनी ते सरकारच्या सर्वोच्च पातळीपर्यंत पोहोचवले. त्यानंतर लगेचच, सरन्यायाधीश खन्ना यांना कळवण्यात आले, ज्यामुळे त्यांनी या विषयावर चर्चा करण्यासाठी तातडीने कॉलेजियमची बैठक बोलावली.

पाचही न्यायाधीशांनी एकमताने न्यायमूर्ती वर्मा यांना दिल्ली उच्च न्यायालयातून हलवावे असे मान्य केले. कॉलेजियमने त्यांना पुन्हा अलाहाबाद उच्च न्यायालयात स्थानांतरित करण्याचा निर्णय घेतला, जिथे ते दिल्लीला नियुक्त होण्यापूर्वी पूर्वी कार्यरत होते. अद्याप कोणतीही औपचारिक चौकशी जाहीर झालेली नाही आणि होईल की नाही हे अद्याप अस्पष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १९९९ च्या अंतर्गत प्रक्रियेनुसार सरन्यायाधीशांना न्यायाधीशांचे स्पष्टीकरण मागण्याची आणि आवश्यक असल्यास अंतर्गत चौकशी करण्यासाठी वरिष्ठ न्यायाधीशांचे एक पॅनेल नियुक्त करण्याची परवानगी आहे.

पण एकूणच सर्व देशात संशयकल्लोळ असून असं झालं तर लोकशाहीच पोरकी होईल. कारण जज साहेबांच्या घरात फक्त नोटा जळत नव्हत्या तर जळत होता न्यायव्यवस्थेवरचा विश्वास!

मागे लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी कॉंग्रेस पक्षावर कारवाई होते. त्यांची बँक खाती गोठवण्यात येतात. समोर निवडणुका बँकेत पैसे, पण खर्च करता येत नाही. मग ते न्यायालयात जातात. आपल्याला न्याय मिळेल. न्यायालय लोकशाही वाचवतील अशी भोळी आशा. पण न्यायमूर्ती अतिशय कडक. सरळ सांगतात कारवाई योग्य. याचिका बरखास्त करतात. कॉंग्रेस पक्ष अडचणीत येतो. ते अतिशय कठोर आणि शिस्तप्रिय असे न्यायाधीश असतात न्या. यशवंत वर्मा. दिल्ली उच्च न्यायालय.

तसं पाहिलं तर त्यांचेही अच्छे दिन सुरु होतात २०१४ नंतरच. आधी ते अलाहाबाद हाय कोर्टात अतिरिक्त न्यायाधीश बनतात. २०२१ मध्ये दिल्ली हाय कोर्टात न्यायाधीश म्हणून नियुक्ती होते. कार्पोरेटचा आणि आर्थिक व्यवहाराचा त्यांचा विशेष अभ्यास असतो.

असं म्हणतात की एकेकाळी सिम्भावली शुगर लिमिटेड या कंपनीचे ते संचालक होते. या कंपनीने ९०० कोटी रुपयांचा घोटाळा केला होता. पण त्यातून ते सहीसलामत सुटले. पुढे हाय कोर्टाचे जज झाले. त्यांच्यासमोर अनेक कार्पोरेट विवाद असलेले खटले येत असतात.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

स्पाइसजेट आणि मारन यांचा ५७९ कोटी रुपयांचा वाद त्यांच्याकडेच आला होता. याशिवाय पेपैलची मनी लॉन्डरिंग केस. दिल्ली सरकारची शराब अबकारी केस.

थोडक्यात अनेक मालदार खटले. अतिशय कडक न्यायाधीश म्हणून त्यांची ख्याती. तर होतं असं हे जज साहेब गावाला जातात. तारीख असते १४ मार्च.

सर्वत्र होळी पेटवली जात असते आणि त्यांच्या दिल्ली येथील सरकारी घरालाच आग लागते. नोकर चाकर फायर ब्रिगेडला बोलावतात. आग विझवता विझवता त्यांच्या लक्षात येतं की, पोत्यांमध्ये भरलेल्या कोट्यावधी रुपयांचा नोटा जळत आहेत. पोलिसांना कळवलं जातं. गुपचूप मोबाइलवर व्हिडीओ काढले जातात.

ती व्हिडीओ क्लिप सुप्रीम कोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तींना पाठवण्यात येते. सगळं गुपचूप चालू असतं. आठवडाभर कुणीतरी हे प्रकरण दाबायचा प्रयत्न करत असतं. पण आठवड्यानंतर म्हणजे २१ मार्चला बातमी येते आणि सर्वत्र त्सुनामी आल्यासारखं होतं.

कुणी सांगतो १५ कोटी होते, तर दुसरा पत्रकार म्हणतो ५० कोटी होते. हिशोब शेकडो कोटी रुपयांचा सुरु होतो. सोशल मिडीयावर धुमाकूळ सुरु होते. तोपर्यंत जज साहेब कुणाला तरी सांगून ती स्टोअर रूम साफ करून टाकतात. नोटांचे अवशेष राहत नाही. आम्हाला काहीच माहिती नाही, कुणीतरी आम्हाला फसवत आहे, ते पैसे आमचे नाही, माझ्या विरोधात एक षडयंत्र होत आहे असे अनेक स्टेटमेंट जज साहेब देऊ लागतात. पण कुणीतरी खंबीर माणूस त्यांच्या सोबत आहे, स्पष्टपणे हे दिसू लागतं.

पीटीआय तर्फे फायर ब्रिगेड च्या प्रमुखाचे स्टेटमेंट समोर येते, आम्हाला नोटा मिळाल्याच नाही. पण गोंधळ वाढत जातो. न्यायव्यवस्थेवरचा विश्वास उडू लागतो. त्यात मोदी सरकारच्या जवळचे वकील टीव्हीवर येऊन वेगळीच बडबड करू लागतात. शेवटी सुप्रीम कोर्ट एक समिती स्थापन करते. तपास सुरु केला जातो. कुठलीही केस त्यांच्यासमोर सुनावणीसाठी येणार नाही हे ठरवलं जातं.

सर्व माहिती सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटवर टाकली जाते. त्यामध्ये नोटा जळत असल्याची ती व्हिडीओ क्लिपपण असते. सगळं काही स्वच्छ, पारदर्शी कारभार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. पण नेमके किती पैसे होते? हे आतापर्यंत तरी जाहीर होत नाही. एकीकडे मोदींची न खाउंगा न खाने दुंगा ची डरकाळी आणि दुसरीकडे छोट्या मोठ्या रकमेसाठी सुद्धा अतिशय आक्रमक झालेल्या ईडी, सीबीआय, इन्कमटॅक्स अशा संस्था.

त्यामुळे कुठलाही अधिकारी असो, नेता असो, भ्रष्टाचाराचा पैसा घरात ठेवताना शंभर वेळा विचार करणार हे नक्की. पण याचा परिणाम फक्त विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच जास्त होताना दिसतो. तुम्ही जर सत्ताधाऱ्यासोबत असाल तर नो प्रॉब्लेम! जर विरोधी पक्षात असाल तर पटकन सत्ताधारी पक्षाच्या सोबत जा आणि भ्रष्टाचार करण्याचे लायसन्स मिळवा अशी परिस्थिती.

त्यामुळे तुरुंगात जाणारे अनेक ईडीग्रस्त नेते सत्ताधाऱ्यांकडे जाऊ लागतात मंत्री-संत्री बनतात. न खाउंगा न खाने दुंगा या वाक्याची विटंबना सुरु करतात. कोट्यवधी रुपयांचा काळा पैसा सर्रास वापरतात. किमान या घटनेचा तपास व्यवस्थित व्हावा. गुन्हेगाराला शिक्षा मिळावी. लोकांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कायम राहावा, ही अपेक्षा.

कारण ईडी, सीबीआय, इन्कमटॅक्स, पोलीस, प्रशासन, निवडणूक आयोग अशा कितीतरी संस्था लोकांच्या मनात संशय निर्माण करत आहेत. संपूर्ण व्यवस्थेवरचा विश्वास पूर्णपणे उडालेला असला तरी लोक अजूनही न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवून आहेत. तोही उडाला तर लोकशाहीच पोरकी होईल. कारण जज साहेबांच्या घरात फक्त नोटा जळत नव्हत्या तर जळत होता न्यायव्यवस्थेवरचा विश्वास, असे जे वर्णन दिलीप लाठी यांनी केले आहे, ते यथार्थ व काळजाला घर करणारे ठरते. ■ ■ ■

## तरूणांनो राजकारण्यांपासून सावध रहा!

आदर्शवत अशा संविधानाने स्थापन झालेली आपली भारतीय लोकशाही पद्धत. पण, सध्या ही संविधानिक लोकशाही पद्धत ही राजकीय सत्ताधाऱ्यांच्या विळख्यात घुसमटत आहे. सर्वच राजकीय पक्ष व त्यांचे नेते सोयीनुसार राजकारण करत आहेत आणि त्याचा सर्व फटका हा बसतो तो म्हणजे सर्वसामान्य जनतेलाच. राजकारण जणू हे पैसे कमावण्याचे साधनच झाले असून प्रामाणिक काम करणारा एखादा राजकीय नेता हा मूर्ख समजला जातो व पक्षश्रेष्ठीच त्याचं राजकीय जीवन उध्वस्त करतात किंवा त्यांच्या मर्जीप्रमाणे वागायला भाग पाडतात. याचा दोष नेमका सर्वसामान्यांनी द्यायचा कोणाला? हा मोठा न उलगडणारा प्रश्नच आहे. एखादा लीडरशिप करणारा तरुण कार्यकर्त्यांच्या जोरावर गल्ली ते दिल्ली मजल मारतो. पण ज्या तरुण संघटनेच्या व कार्यकर्त्यांच्या जोरावर जातो, ते मात्र गल्लीतच असतात. अण्णा, दादा, भाऊ, आप्पा, नाना, तात्या ही मंडळी कार्यकर्त्यांच्या सर्वसामान्य मतदारांच्या जीवावर आपली राजकीय मजल मारतात. ते ज्या पक्षात आहे त्यांचे कार्यकर्ते आपलाच पक्ष म्हणून अंमलबजावणी करतात. विरुद्ध पक्षांना व त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तेढ निर्माण होतात. मारामाऱ्या, दंगे, कोर्टकचेरी हे सर्व कार्यकर्त्यांच्या वाट्याला येते आणि ज्यांच्यासाठी आपण जीवाचं रान करतो ती नेतेमंडळी मात्र सोयीनुसार विरोधी पक्षाच्या बाकावर जाऊन सत्ताधारी होतात आणि सर्वसामान्य कार्यकर्ता मात्र यात रगडतो व एकटा पडतो. आर्थिक दृष्ट्या कमकुवत होतो व देशोधडीला लागतो. राजकीय नेते मात्र काही ठराविक कार्यकर्ते मोठे करतात आणि हेच कार्यकर्ते अण्णा, दादा, भाऊ, आप्पा, नाना, तात्या, यांचे डावे उजवे हात बनतात. पण, हे कुठेतरी थांबायला हवं. जनतेने आणि तरुणांनी ही राजकीय नेते मंडळी व त्यांची पिलावळ योग्य वेळी थांबवली नाही तर बीडचा बिहार आणि मस्साजोग सारख्या एका निरपराध असणाऱ्या सरपंच संतोष अण्णा देशमुख यांच्या निर्घृण हत्येची प्रवृत्ती पुन्हा पुन्हा घडत राहील. त्यामुळे आता तरी तरुणांनो जागे व्हा. राजकारण्यांच्या मागे लागून कष्ट न करता मोठे होण्याची स्वप्न पाहू नका. आपण छत्रपतींच्या स्वराज्यातील मावळे आहोत. कष्ट करून मोठे व्हा. प्रामाणिक कष्टाची व घामाची भाकर नेहमीच स्वादिष्ट लागते व सुखाची झोप देते. हाताला येईल ते काम करा, काम करताना लाज शरम बाळगू नका, आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम व मेहनत करा. तुम्ही जास्त पैसे कमवावे ही त्यांची अपेक्षा नाही, मात्र जे कमवाल ते प्रामाणिकपणाचे असावे हीच गोष्ट त्यांना आनंद येणारी असेल. राजकारण्यांची लुलू थुपु करण्यापेक्षा आई-वडील व कुटुंबाला दिलेली वेळ हीच तुमची खरी श्रीमंती व पुढच्या पिढीचा आदर्श असेल.

■ मनोज नारायण वाजे
९५११६९९३२३

## सीलबंद पाणी : सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का?

लहानपणी शाळेत मराठी व्याकरण शिकवले जात असे ज्यामध्ये सामान्य नाम आणि विशेष नाम असे नामाचे दोन प्रकार सांगितले जात. एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला मिळालेले नाव म्हणजे सामान्य नाम तर एकाच जातीच्या विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध करते त्या नावाला विशेष नाम असे म्हणतात.

ही झाली व्याकरणातील व्याख्या. दैनंदिन जीवनात व्यवहारात उपयोगी पडणारी काही अशी विशेष नाम आहेत जी त्यांच्यातील गुणवत्तेमुळे आणि ग्राहकांच्या पसंतीमुळे सामान्य नाम बनून आज लोकांच्या ओठी रुजली आहेत. उदाहरणच द्यायचे तर ग्रामिण भागात (काही शहरी भागांतसुद्धा) अंगाचा साबण हवा असेल तर 'लाईफबॉय द्या' अशी मागणी ग्राहकांकडून केली जाते,

अशाच प्रकारे टूथपेस्ट म्हणून 'कोलगेट' मागितली जाते, भांड्यांचा साबण म्हणून 'विम बार' मागितला जातो. याच विशेष नामांतून सामान्य नाम झालेल्या उत्पादनांच्या यादीत आणखी एक नाव येते ते 'बिस्लेरी'चे. बिस्लेरी कंपनीने १९८४ मध्ये सर्वप्रथम सीलबंद फिल्टर्ड पाण्याची प्लास्टिक बाटली विक्रीसाठी आणली तेव्हा कोणाला वाटलेही नव्हते कि पाणी बाटल्यांत भरून विकण्याची संकल्पना भविष्यात जनसामान्यांत इतकी रुजेल की त्याहून जगणे मुश्किल होऊन जाईल.

आज सीलबंद बाटल्यांची लोकांना इतकी सवय जडली आहे की बाहेर उपहारगृहात जेवताना किंवा काही अन्नपदार्थ खाताना उघड्यावरील विनामूल्य पाणी पिऊन पोटाला त्रास करून घेण्याऐवजी लोक २० रुपयांची एक लिटरची सीलबंद पाण्याची बाटली विकत घेणे पसंत करतात.

पूर्वी प्रवासाला जाताना लोक घरातून पाण्याचे कॅन अथवा बाटल्या भरून घेऊन जात. आता असा त्रास कोणी करताना दिसत नाही. हल्ली स्थानकांवरच नव्हे तर तर चालत्या ट्रेनमध्ये आणि बसमध्येही थंडगार फिल्टर पाण्याची बाटली सहज उपलब्ध होऊ लागली आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत. गेल्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे. शरीरातून घामावाटे जाणाऱ्या पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी लोक सीलबंद पाणी विकत घेऊ लागले आहेत.

आजमितीला केवळ शीतपेयाच्या दुकानांत किंवा उपहारगृहांतच नव्हे तर महामार्गाच्या ठिकाणी पानाच्या टपरीवर, फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानांतूनही सीलबंद पाण्याच्या बाटल्या विकल्या जाऊ लागल्या आहेत. उन्हाने जीव कासावीस झालेला असताना या थंडगार सिलबंद पाण्याचा एक घोट जरी घशाखाली उतरला तरी स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो.

सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत. पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिस्लेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे.

बिस्लेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते. या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने तपासलेली असते का? त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का?

एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते. लांबच्या प्रवासात रेल्वे डब्यात पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्यांकडेही अशाच वेगवेगळ्या कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या दिसून येतात. यामध्ये भरले गेलेले पाणी शासनाने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शुद्ध केलेले असते का?

सीलबंद २० लिटर पाण्याच्या बाटला बाबतही तीच परिस्थिती आहे. आजमितीला अनेक कंपन्या, आस्थापने आणि कार्यालये यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे २० लिटरचे बाटले मागवले जातात. रिकामे झालेले बाटल्या वॉटर सप्लायर्स घेऊन जाऊन दुसऱ्या दिवशी त्याच बाटलांमध्ये पाणी भरून आणतात. ८० ते १०० रुपये प्रति बाटला दराने भरून आणलेले हे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया करून आणलेले असते कि थेट नगरपालिकेच्या नळातून भरलेले असते याची खात्री कोण करतं?

पुन्हा पून्हा वापर केला जाणाऱ्या या बाटलांना काही वेळा खालून शेवाळे लागलेले पाहायला मिळते, हे बाटले किती वेळा वापर केल्यावर नष्ट करावेत याबाबत सीलबंद पाणी विकणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्यांना माहिती असते का ?

आज भ्रष्टाचार दिल्लीपासून गल्लीपर्यंत मुरला आहे. सीलबंद पाण्याच्या बाटल्या बनवणाऱ्या कंपन्या याबाबतीत मागे राहतील का? ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते.

सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागल्यावर आपण जवळपास कुठे थंड पाण्याची बाटली विकत मिळते का ते शोधू लागतो. मिळाल्यावर ती कुठल्या कंपनीची आहे, त्या बाटलीवरील लेबलवर ट्रेडमार्क आहे का ? बाटलीवर एक्सपायरी डेट लिहिलेली आहे का ? लिहिली असल्यास ती उलटून तर गेली नाही ना? पाणी विकणारी कंपनी शासनमान्य आहे का याबाबत कोणतीही खात्री न करता आपण तिचे बूच उघडून ती तोंडाला लावतो, हे आपण जागरूक ग्राहक नसल्याचेच लक्षण आहे.

आरोग्य राखण्यासाठी घेतलेली पाण्याची बाटली आरोग्य बिघडवणारी ठरू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहायला हवे. दिवाळी जवळ आली कि शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ठिकठिकाणी मिठाईच्या उत्पादकांवर धाडी मारून माव्याची तपासणी करतात. नकली मावा तयार करणाऱ्यांवर कारवाई करतात अशाच प्रकारची तपासणी उन्हाळ्याच्या दिवसांत सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांमध्येही करायला हवी ! ■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## २८ मार्च दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**

१७३६: बाजीराव पेशव्यांनी दिल्लीवर हल्ला करुन मोगलांचा पराभव केला.
१८५४: क्रिमियन युद्ध झ्र फ्रान्सने रशियाविरुद्ध युध पुकारले.
१९१०: हेन्री फाब्रे यांनी फाब्रे हायड्राविओन हे पहिले सागरी विमान उडविले.
१९३०: तुर्कस्तानमधील कॉन्स्टँटिनोपाल आणि अंगोरा शहरांची नावे बदलुन इस्तंबुल आणि अंकारा अशी करण्यात आली.
१९४२: रासबिहारी बोस यांनी टोकियो येथे इंडियन इंडिपेन्डन्स लीग ची स्थापना केली.
१९७९: अमेरिकेतील थ्री माईल आयलंड या बेटावर असलेल्या अणूभट्टीतून किरणोत्सारी पदार्थांची गळती झाली.
१९९२: उद्योगपती जे. आर. डी. टाटा यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.
१९९८: सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग या संस्थेने विकसित केलेला परम-१०००० हा महासंगणक देशाला अर्पण करण्यात आला.
१९८८: ६१ वि घटना दुरुस्ती करून मतदाराचे किमान वय २१ वर्षांवरून वरून १८ वर्षांवर वर आणण्यात आले

**२८ मार्च जन्म :**

१८६८: रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की यांचा जन्म.
१९२५: अभिनेता राजा गोसावी यांचा जन्म.
१९२७: भारतीय सामाजिक कार्यकर्त्या विना मझुमदार यांचा जन्म.
१९६८: इंग्लिश क्रिकेटपटू नासिर हुसैन यांचा जन्म.

**२८ मार्च मृत्यू :**

१९४१: ब्रिटिश लेखिका व्हर्जिनिया वूल्फ यांचे निधन.
१९६९: अमेरिकेचे ३४ वे राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांचे निधन.
१९९२: स्थानकवासी जैनांचे सर्वश्रेष्ठ धर्मगुरू आचार्य सम्राट आनंदऋषीजी यांचे निधन.
२०००: शांताराम द्वारकानाथ तथा राम देशमुख यांचे निधन.

## वाचक लिहितात

### छत्रपती संभाजी राजे बलिदान दिन

छत्रपती संभाजी राजांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर झाला. लहानपणीच मातृछत्र गेल्यामुळे मासाहेब जिजाऊंच्या वात्सल्याच्या छायेत ते वाढले. शंभूराजांची कुशाग्र बुद्धिमत्ता, भाषा चातुर्य, साहित्य, राजनीति, आणि युद्धकौशल्यनिपुणता वादातीत होते. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकायला त्यांना आवडत असे.

अगदी वयाच्या नवव्या वर्षी पुरंदरचा तह आणि त्याचे परिणाम ,नंतर आग्र्याहून सुटका अशा प्रसंगांना ते सामोरे गेले. औरंगजेबाविषयी कटू भावना तेव्हापासूनच त्यांच्या मनात निर्माण झाली होती. औरंगजेब किती निष्ठुर, दुष्ट आणि कपटी स्वभावाचा आहे हे त्यांनी, त्याला जवळून बघितल्यामुळे चांगले माहीत होते. संभाजी राजे औरंगजेबासोबत लढत असताना कौटुंबिक पातळीवर घरभेद्यांसोबतही लढत होते. त्यांच्यासोबतच्या लोकांनी स्वतःच्या स्वाथार्साठी त्यांच्याविषयी गैरसमज पसरवले.

प्रत्यक्षात शंभूराजांच्या अंगी शौर्य, धर्य ,कल्पकता, गनिमी कावा, धर्मनिष्ठा ,आचार शुद्धता हे सर्व गुण होते. युद्धकलेतही ते शिवाजी महाराजां प्रमाणेच निपुण होते . शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अनेक कटकारस्थाने संभाजी राजांच्या विरुद्ध करण्यात आली. स्वतःच्या वडिलांना अग्नी द्यायचा अधिकार सुद्धा त्यांचा कडून हिरावून घेतला. या प्रसंगाने शंभुराजे मनाने रक्तबंबाळ झाले. परंतु सगळ्या कावेबाजांना पुरून उरून त्यांनी स्वराज्य हाती घेतले. आणि औरंगजेबावर संपूर्ण लक्ष केंद्रित केले. कारण औरंगजेब स्वराज्यात तळ ठोकून बसला होता. त्याला मारण्यासाठी बऱ्याच क्लुप्त्या शंभूराजांनी केल्या पण प्रत्येक वेळी तो औरंगजेब वाचला. नियतीच्या मनात काही वेगळेच होते. एकाच वेळी शंभूराजांना अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही प्रकारच्या शत्रूंना तोंड द्यावे लागले . स्वराज्याशी फितुरी करणाऱ्यांना त्यांनी कठोर शासन केले.

सतत युद्धजन्य परिस्थितीमुळे शंभुराजे रायगडावर कमी राहत. एकदा ते सैन्याची टेहाळणी करत असताना संगमेश्वराजवळ फितुरीमुळे पकडले गेले. त्यांच्यासोबत त्यांचा मित्र-सेवक कलश सुद्धा होता. औरंगजेबाने त्यांना अतिशय क्रूरपणे मारले.

गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी म्हणजे फाल्गुन अमावस्येच्या दिवशी शंभुराजांची अमानूष हत्या केली. असा क्रूरकर्मा, निर्दयी औरंगजेब पुन्हा या धर्तीवर जन्म घेऊ नये.

स्वधर्मासाठी, स्वराज्यासाठी शंभूराजांनी केलेले बलिदान शतकानू शतके आपल्या कायम स्मरणात राहील. शंभूराजांच्या बलिदानाने महाराष्ट्र पेटून उठला. औरंगजेब कधीही स्वराज्य जिंकू शकला नाही. शेवटी याच मातीत मेला. शंभुराजां सारखा धर्माभिमान प्रत्येक हिंदुत जागृत रहावा ही काळाची गरज आहे. त्यासाठी जगदंबा भवानी मातेच्या चरणी प्रार्थना करू या. आणि शंभूराजांच्या विषयी मनात सतत कृतज्ञता व्यक्त करू या. कारण धर्म रक्षणासाठी कसे लढायचे हे त्यांनी शिकवले.

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

## झोपण्यापूर्वी मखाना दूध



लोकं निरोगी राहण्यासाठी त्यांच्या आहारात निरोगी गोष्टींचा समावेश करतात. अशातच निरोगी पदार्थांबद्दल बोलायचे झाले तर, त्यात मखानाला खूप प्राधान्य दिले जात आहे. मखाना हा एक सुपरफूड मानला जातो कारण त्यात प्रथिने, कॅल्शियम, अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात.

पण जेव्हा मखाना दुधात मिक्स करून घेता तेव्हा त्याचे फायदे आणखी वाढतात. चांगली झोप आणि संपूर्ण पोषणासाठी मखाना दुध हा एक उत्तम पर्याय असू शकतो.

मखान्यामध्ये सेरोटोनिन आणि ट्रिप्टोफॅन नावाचे संयुगे आढळतात, जे तणाव कमी करण्यास आणि चांगली झोप घेण्यास मदत करतात. रात्री ते प्यायल्याने मन शांत राहते आणि निद्रानाशाची समस्या कमी होते.

मखाने आणि दूध दोन्ही कॅल्शियम आणि फॉस्फरसचे चांगले स्त्रोत आहेत. हे हाडे आणि सांधे मजबूत करते.

रात्री मखाना दूध प्यायल्याने पचनसंस्था निरोगी राहते. यामध्ये असलेले फायबर बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते आणि पोट हलके ठेवते.

मखान्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, ज्यामुळे तो मधुमेहाच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर ठरेल. यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि अमीनो ॲसिड त्वचेला चमकदार बनवतात आणि केसांची वाढ देखील वाढवतात.

परंतु, मखाना दूध पिण्याचे काही तोटे देखील आहेत . मखान्यात फायबरचे प्रमाण जास्त असते, म्हणून ते जास्त प्रमाणात प्यायल्याने पोट जड किंवा फुगलेले वाटू शकते. म्हणून ते कमी प्रमाणात सेवन करा.

काही लोकांना मखान्याची ॲलर्जी असू शकते, ज्यामुळे त्वचेच्या किंवा पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. मखानामध्ये कॅलरीज कमी असतात, परंतु जर तुम्ही ते दुधासोबत जास्त प्रमाणात घेतले तर ते वजन वाढवू शकतात. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### भ्रमनिरास

पेट्रोल वाढले
डिझेल वाढले
वाढले गॅसचेही दर
सर्वसामान्य माणसाला
हे पेलणार कुठवर?

सोयाबीन येता घरी
बाजारभाव कोसळले
दुप्पट भाव देणाऱ्यांनी
विरोधी धोरण अंगिकारले..









## आज का अंदाज

शुक्रवार २८ मार्च २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३९० | ४९० | १२३ | १४४ | ११० | ४५६ | १५० | १२४ |
| ४८० | ५८० | २६८ | २७० | २०० | २४९ | २४० | २६९ |
| ५७० | ६७० | ३६७ | ३६० | ३९० | ३५७ | ३३० | ३६८ |
| २० | ३० | ६१ | ९१ | २१ | ५१ | ६० | ७० |
| २७ | ३७ | ६५ | ९५ | २१ | ५१ | ६८ | ७८ |
| २४ | ३४ | ६८ | ९८ | २३ | ५३ | ६४ | ७४ |


२८ मार्च: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | ४५ | ७० | ८० |
| १९ | ४९ | ७२ | ८२ |
| १३ | ४३ | ७६ | ८६ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## शब्दकोडे क्रमांक २०६८




**आडवे शब्द :-**
१) अतिशय कृपण, नीच, कृतघ्न माणूस (वा.प्र.)
८) सेवक
१०) रममाण, तल्लीन
११) मजबूत
१३) श्रीविष्णूचे एक नाव
१५) चांदणी
१७) देणारा
१८) तंबाखूचे सुगंधी चूर्ण
२०) विरोध, अडथळा
२२) सरकारी नियम
२४) फिकीर
२५) कच्चे लिखाण (इं.)
२६) लोणच्यातील तेलमसाला
२७) जन्मदाता
२९) लोककथा
३०) पाचवारी लुगडे
३१) सिंह
३२) अभिप्राय
३३) पुष्कळ
३४) लोखंडाला आकर्षित करणारा
३५) श्रीविष्णूचे एक नाव
३६) मरण्याची स्थिती, नाश पावलेला भाग
३८) हिंदीत सर्व
३९) धपाटा
४०) धडधड (हिं.)
४१) भीती
४३) कहाणी
४५) शाश्वत, चिरकाल टिकणारा
४६) शोक, दु:ख (उर्दू)
४८) एकूणएक, सर्व
५०) सत्ताविसावे नक्षत्र
५२) बनारस
५३) पिकांवर पडणारा एक रोग
५४) चित्रपटाचा पडदा
५६) मज्जाव, बंदी
५७) कट्टा
५८) चमक, मुरगळा
५९) लाकूड कापण्याचे हत्यार
६१) आश्रय
६२) मोठा जाड अंगरखा
६३) संपत्ती
६४) खटला
६६) मोठे माकड
६७) द्रव्य, पैसा
६९) लोखंड घासण्याचे हत्यार
७०) वजन
७१) स्त्रीपिशाच्च, हडळ
७२) इंद्राणी
७३जास्तीत जास्त

**उभे शब्द :-**
१) डोके(ग्रा.)
२) वरपांगी
३) पद्धत
४) उल्का पडून तयार झालेले महाराष्ट्रातील एक सरोवर
५) पलंग
६) वहिवाट, जाणे येणे
७) चुका करत करत
९) किरकोळ सामान
१२) गाडीचे छत
१४) मोठे गाव
१५) घाई, त्वरा
१६) चुलता
१७) मोठा भाऊ
१९) पोपट
२१) पैशाशी पैसा जोडणारा, कंजूष
२३) काळपुरुष
२४) सर्वस्व
२६) विशेष
२८) चटकन त्वरित
३०) धैर्य, हिंमत
३१अ) *** ** ** *** तरी लाज राख एक वाकप्रचार
३३) विवाह विच्छेद
३६) मधुमक्षिका
३७) अवघड, कष्टप्रद त्रासदायक
४२) लक्ष्मी
४४) हवा खाण्यासाठी जागेत बदल
४७) चार आठवडे
४९) दहावी रास
५१) धनुष्यबाण
५५) एकाग्र नजर
५६) मत देण्याची क्रिया
५७) मर्यादा
६०) फळातील द्रवपदार्थ
६२) शुष्क, चाबूक
६५) दिवस
६७) पोशिंदा, मालक
६८) कावळा
६९) आजच्या आधीचा दिवस

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### कल्कीरामजी महाराजांना जिल्हाबंदी



**औरंगजेबाची कबर तोडण्याचा इशारा दिल्याचे प्रकरण**

**नाशिक ।** खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीवरून वातावरण तापले असल्याने जिल्हा प्रशासन अलर्ट मोडावर आहे. आतापर्यंत प्रशासनाकडून चार जणांना जिल्हाबंदी केली होती. औरंगजेबाची कबर तोडण्याचा इशारा दिल्यावरून आदिनाथ संप्रदायाचे प्रमुख कल्कीरामजी महाराज यांच्यासह अन्य दोघे आणि त्यांच्या समर्थकांना गुरुवारपासून पुढील दहा दिवस जिल्हाबंदी करण्यात आली आहे. मराठी नववर्ष गुडीपाडव्यानिमित्त रविवारी काल्कीरामजी महाराज यांच्या नेतृत्वात हिंदू बांधव औरंगजेबाची कबर तोडून बाबरीची पुनरावृत्ती करतील, असा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून हो जिल्हाबंदी करण्यात आली आहे. आदिनाथ संप्रदायाचे नाशिक येथील प्रवीण जाधव यांनी पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या आंदोलनासाठी परवानगी मागितली आहे. सध्या रमजानचा महिना सुरू आहे या काळात सामाजिक सलोखा अबाधित राहावा, कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी कल्कीरामजी महाराज, प्रयोग जाधव, भावान हुआ त्यांच्या समर्थकांना गुब्बार पासून जिल्ह्यात प्रवेशासाठी बंदी करण्यात आली आहे.

### माया वाघ यांची विस्तार अधिकारीपदी निवड




**दिंडोरी ।** तालुक्यातील कादवा सहकारी साखर कारखाना येथील प्रा. माया वाघ (गांगोडे) यांची नुकतीच विस्तार अधिकारी म्हणून निवड झाली. माया वाघ यांनी अनेक वर्ष कादवा साखर कारखाना येथील शैक्षणिक विभागात प्राध्यापक म्हणून काम केले आहे. परंतु आपण वेगळे काही तरी करून दाखवावे हि इच्छा मनाशी बाळगल्याने नवं नवीन क्षेत्रात अनेक परीक्षा दिल्या व त्यांना त्यात चांगल्या प्रकारे यशही आले. त्यांची नुकतीच शैक्षणिक विभागात विस्तार अधिकारी म्हणून निवड झाली. त्यांच्या निवडीचे कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे व सर्व संचालक मंडळ तसेच शैक्षणिक विभागातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### आरोग्य विद्यापीठाला सावरकरांचे नाव द्यावे

**नाशिक ।** नाशिकमध्ये असलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्यवक महात्मा गांधी विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे समन्वयक डॉ. पूर्व हिरे यांनी केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राला कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे नाव देण्यात देण्यात येणार आहे. या प्रस्तावना विद्यापीठाच्या आधी सभेत मान्यता मिळाली; परंतु काही विद्यार्थी संघटना आणि त्यास विरोध दर्शवीत विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्रास स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे नाव द्यावे, अशी मागणी केली आहे. या विषयाबाबत मत व्यक्त करताना डॉ. अपूर्व हिरे यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे फक्त महाराष्ट्रसाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमान असून, त्यांनी स्वातंत्र्यासाठी व त्याच्या प्रतिकृती दिलेले योगदान खूप मोठे आहे. त्यामुळे त्यांच्या नावाला योग्य सन्मान मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठाला त्यांचे नाव द्यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

### म्हसरुळ परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव

**नाशिक ।** गेल्या काही दिवसांपासून



शहरातील म्हसरुळ परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे त्यांचा उपद्रव वाढला असून, नागरिकांना धोका निर्माण झाला आहे. आरोग्यासाठी भल्या पहाटे बाहेर पडणारे नागरिक तसेच नोकरी, व्यवसायसाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांच्या अंगावर हे कुत्रे धावून जातात. भटके कुत्र्यांची दहशत वाढली आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. याशिवाय दुचाकी वाहनांच्या मागे लागल्यामुळे अनेकदा वाहन चालक पडता पडता वाचतात. याबाबत अनेकदा तक्रारी करूनही महापालिकेचा संबंधित विभाग काही कारवाई करत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. परिसरातील नागरिक उघड्यावर टाकून देत असलेल्या अन्नावर हे भटके कुत्रे पोसले जात असल्याने त्यांचा उपद्रव अधिकाधिक वाढत आहे. महापालिकेची श्वान निरबिजीकरण मोहीमही राबवली जात असली तरी त्याचा फारसा उपयोग दिसत नसल्याचे चित्र आहे.

# डुबेरेच्या अकरा तरुणांनी विविध शासकीय पदावर बाजी मारत इतिहास घडविला




**सिन्नर ।** ऐतिहासिक वारसा असलेले डुबेरे हे गाव राजकीय सामाजिक सहकार व शैक्षणिक दृष्ट्या जिल्ह्यात नव्हे तर राज्यातही प्रसिद्ध आहे. मात्र ते शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत मागे असल्याची खंत नेहमीच डुबेरकरांना असतानाच परिसरातील अकरा तरुणांनी विविध शासकीय पदावर नियुक्ती झाल्याने डुबेरे गावच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे रोवला गेला आहे.

उज्वल भविष्यासाठी गावच्या व देशाच्या विकासासाठी प्रत्येक तरुणाने कठोर मेहनत करत एमपीएससी यूपीएससी सारख्या परीक्षांवर लक्ष केंद्रित करायला हवे, हा संदेश तरुणांचा सत्कार आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण वाजे यांनी व्यक्त केला. यावेळी सरपंच रामनाथ पावशे, प्रगतशील शेतकरी मोहन माळी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अंकुश रामहरी पावसे (डेप्युटी फिल्ड ऑफिसर), अभिजीत रामनाथ पावशे (कोपरगाव नगरपरिषद स्थापत्य अभियंता), सागर अशोक वाजे (टी सी कलेक्टर), शंतनू रावसाहेब पवार, ऋषिकेश रमेश माळी, मंगेश सुदाम मंडलिक (मुंबई पोलीस), अंकुश दिलीप वाजे, ऋतिक रामेश्वर मंडलिक, वैभव शंकर शिंदे, कृष्णा सुभाष वारूंगसे व ओमकार सुदाम वाजे (इंडियन आर्मी) हे नियुक्त झालेली शासकीय अधिकारी व कर्मचारी आहेत. 'माझं स्वप्न हे आयएसए होण्याचे होते व अजूनही आहे. मात्र सध्या माझी जेथे नियुक्ती झाली आहे, त्या पदाला योग्य न्याय देण्याचे काम मी करेल ही भावना व्यक्त करत अंकुश पावसे यांनी सत्काराला उत्तर दिले. लहानपणापासूनच आर्मीमध्ये जाण्याची इच्छा होती. त्यामुळे इयत्ता सहावी पासूनच रनिंग सुरू केली. शाळेच्या माध्यमातून तालुका जिल्हा व राज्यस्तरापर्यंत मजल मारण्याची संधी मिळाली. प्रॅक्टिसमध्ये सातत्य ठेवले. त्यामुळे आज स्वप्न पूर्ण झाले, असे मत अंकुश दिलीप वाजे यांनी व्यक्त केले. यावेळी सर्व सत्कारमूर्तींनी आपापल्या भावना व्यक्त करत सत्काराला उत्तर दिले. यावेळी उपसरपंच इंदुबाई वारुंगसे, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, माजी सरपंच अर्जुन वाजे, विविध विकास सोसायटीचे चेअरमन अशोक गवळी, व्हाईस चेअरमन रवींद्र माळी, पोलीस पाटील रामदास वारुंगसे, उद्योजक अण्णासाहेब वारुंगसे, सुनील वारुंगसे, अशोक वाजे, सोमनाथ वाजे, विष्णू जाधव, गणेश वारुंगसे, पांडुरंग पडवळ, नामदेव वाजे, कैलास माळी, पोलीस दलात कार्यरत असणारे आकाश पवार, ग्रामपंचायत कर्मचारी नामदेव पावशे, विनोद रुपवते, सागर रुपवते व ग्रामस्थ उपस्थित होते. गणेश वाजे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यासाठी कार्यकर्ते उपस्थित राहणार

**नाशिक ।** मनसेचा गुढीपाडवा मेळावा रविवारी दि. ३० मार्च रोजी होणार असून, हा मेळावा संपूर्ण देशासाठी महत्त्वाचा लक्ष वेधणारा आहे. मनसेच्या मुंबईतील गुढीपाडवा मेळाव्यासाठी रविवारी नाशिक जिल्ह्यातून १ हजार वाहनांचा ताफा जाणार असून सुमारे १० हजार कार्यकर्ते आपल्या नाशिक जिल्ह्यातून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रदेश सरचिटणीस दिनकर अण्णा पाटील, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख ‡ जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला प्रदेश अध्यक्ष सुजाता डेरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यातील पंधराही तालुक्यात तसेच शहरातील पंचवटी, नाशिकरोड, मध्य नाशिक, सातपूर, सिडको येथे दौरे केले. या दौऱ्यात सर्व पदाधिकाऱ्यांना संबोधित करण्यात आले. तसेच पदाधिकाऱ्यांच्या व नागरिकांच्या समस्या समजावून घेण्यात आल्या. या झालेल्या दौऱ्या नुसार जिल्ह्यातील व शहरातील समस्यांवर येत्या ३० मार्च नंतर मोठे आंदोलन करण्यात येणार आहे. नागरिकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून सत्ताधाऱ्यांना जाब विचारला जाणार आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झालेले आहे. संपूर्ण जिल्हा व शहर मधून सुमारे दहा हजार पदाधिकारी व कार्यकर्ते मुंबई येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे भाषण ऐकण्यासाठी जाणार आहेत. यासाठी जिल्हा व शहर मधून सुमारे १ हजार वाहनांचा ताफा निघणार आहे. यामध्ये बसेस चार चाकी आहे. काही पदाधिकारी व कार्यकर्ते रेल्वेने देखील जाणार आहेत. दि.३० मार्च रोजी सकाळी ८ वाजता महाराष्ट्र नवनिर्माण सेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक येथून मेळाव्यासाठी निघणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी सरचिटणीस दिनकर पाटील, उपाध्यक्ष सलीम मामा शेख, जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, उप जिल्हाध्यक्ष मनोज घोडके, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, सचिन सिन्हा, धीरज भोसले, योगेश दाभाडे, बंटी कोरडे, नितीन माळी तसेच शहर उपाध्यक्ष मिलींद कांबळे, अनंता सांगळे, ज्ञानेश्वर बगडे, विशाल बाहुले, खंडेराव मेढे आदी उपस्थित होते.

# नाशिक 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह'ची पाठ्यपुस्तक दान मोहीम

## दहावीच्या विद्यार्थ्यांकडून अनोखा उपक्रम; ५०० गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तक

**नाशिक ।** नाशिकमधील 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह' या संघटनेने यंदाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. समूहाच्या माध्यमातून गरीब, गरजू आणि होतकरू इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरण करण्याचा हा उपक्रम असून, यास जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकडून उदंड प्रतिसाद मिळाला आहे.

आतापर्यंत सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी नोंदणी केली आहे. या उपक्रमाची विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, हा समूह नाशिक मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः सुरू केला असून, कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन हे विद्यार्थीच करत आहेत. दहावीच्या परीक्षा समाप्तीनंतर आयोजनाच्या हालचालींना वेग आला आहे. समूहाचे प्रमुख प्रसाद भालेकर आणि अदित्य रिकामे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवला जात आहे.

> **पुस्तक दान करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी समूहाचे प्रमुख प्रसाद भालेकर यांच्याशी ९५२९१९५६८८ किंवा ईमेल आयडी jivankeshrimarathi@gmail.com वर सायं ४ ते ८ या वेळेत संपर्क साधावा.**

उपक्रमात अमित पगार, ओम क्षीरसागर, ओमकार कुटे, अथर्व तुपे, सार्थक पवार, लायगुडे, मंथन शेरताटे आणि आर्यन इंगळे हे विद्यार्थी सक्रियपणे सहभागी आहेत. अनेक विद्यार्थी हे खेड्यातील वस्तीत वास्तव्यास असून, त्यांच्या शिक्षकांनी पाठ्यपुस्तकांसंदर्भात विचारणा करून विद्यार्थ्यांची नावनोंदणी करून घेतली आहे. यामुळे शिक्षकांच्या विद्यार्थ्यांविषयी असलेली आपुलकी व गुरूची शिष्यांबद्दल असलेली भावना दिसून आली. जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह नाशिक तर्फे पाठ्यपुस्तके दान करणे संदर्भात सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. जे नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, पालक किंवा व्यावसायिक १०० किंवा १०० पेक्षा अधिक पुस्तकांचे संच उपक्रमासाठी उपलब्ध करून देतील, अशा सर्वांचा विशेष सत्कार करण्यात येईल. त्याचबरोबर त्यांच्या हस्ते पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येईल. व्यावसायिकांच्या उत्पादनाचे किंवा प्रकल्पाचे प्रमोशन "प्रायोजक" (स्पॉन्सर) म्हणून करण्यात येईल. सामान्य नागरिक असतील तरीही त्यांना "प्रायोजक" म्हणून घोषित करण्यात येईल. इयत्ता नववी व दहावीचे विद्यार्थीही या उपक्रमात सहभागी होऊन पाठ्यपुस्तके दान करू शकतात. पाठ्यपुस्तके दान करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार असल्याचे समूहाने स्पष्ट केले आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून समाज-परिवर्तन घडवू पाहणाऱ्या या तरुण विद्यार्थ्यांचा हा उपक्रम नाशिक शहरातील समाजसेवेचे एक उत्तम उदाहरण ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांना सहकार्य करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे येणे आवश्यक आहे.

## 'एप्रिल मे ९९' मध्ये झळकणार 'हे' चेहरे

**रो**हन मापुस्कर दिग्दर्शित 'एप्रिल मे ९९' चित्रपटाचा टीझर काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला. टीझर पाहून या चित्रपटात कोण कलाकार झळकणार, याची प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता लागली असतानाच चित्रपटातील तीन कलाकारांचे चेहरे समोर आले आहेत. कृष्णा, प्रसाद आणि सिद्धेशच्या मैत्रीची ही गोष्ट आहे. मात्र यात आणखी एक प्रमुख चेहरा आहे जो अद्यापही पडद्याआड आहे. त्यामुळे याबद्दलची उत्सुकता अजूनही ताणलेलीच आहे. दरम्यान यात चित्रपटात आर्यन मेंगजी (कृष्णा), श्रेयस थोरात (प्रसाद) आणि मंथन काणेकर (सिद्धेश) यांच्या भूमिका आहेत.



आर्यन मेंगजी, श्रेयस थोरात व मंथन काणेकर या तिघांनी याआधीही काही चित्रपटांत, मालिकांमध्ये काम केले आहे. आर्यन मेंगजी याने 'मोनिका ओ माय डार्लिंग', बरोट हाऊस', 'डायबुक', 'बाबा', '१५ ऑगस्ट', 'बालभारती' अशा अनेक मराठी, हिंदी चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. आर्यनला महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात 'बालभारती' चित्रपटासाठी उत्कृष्ट बालकलाकार म्हणून पुरस्कारही मिळाला आहे. श्रेयस थोरात याने कलर्स मराठीवरील 'सुखी माणसाचा सदरा' या मालिकेत मोरूची भूमिका साकारली असून प्रेक्षकांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. तर मंथन काणेकर याने 'जय जय स्वामी समर्थ', 'योगयोगेश्वर जय शंकर', आणि 'गाथा नवनाथांची' या लोकप्रिय मालिकांमध्ये आपल्या अभिनयाने ओळख निर्माण केली आहे. आता हे कृष्णा, प्रसाद आणि सिद्धेश उन्हाळ्याची सुट्टी गाजवायला सज्ज झाले आहेत.

दिग्दर्शक रोहन मापुस्कर म्हणतात, 'एप्रिल मे ९९' या चित्रपटातील भूमिका साकारण्यासाठी योग्य कलाकार निवडणं आमच्यासाठी आव्हानात्मक होतं. अनेक मुलांच्या ऑडिशन्स घेतल्यानंतर आम्ही आर्यन, श्रेयस आणि मंथन यांची या चित्रपटासाठी निवड केली. आर्यनची माधुरी दीक्षित यांच्या '१५ ऑगस्ट' चित्रपटासाठी मीच निवड केली होती. तर रोहित शेट्टी यांची निर्मिती असणाऱ्या 'स्कूल कॅालेज आणि लाईफ' या चित्रपटासाठी श्रेयसची निवड केली होती. त्यामुळे हे दोघे माझ्या परिचयाचे होते. असे असले तरीही आमच्या टीमने ऑडिशन घेऊन ते या भूमिकेत चपखल बसतात का, याचा विचार करूनच त्यांची निवड केली. सिद्धेशच्या भूमिकेसाठीही आम्ही बरेच पर्याय बघितले होते. परंतु त्याचे आणि त्याच्या वडिलांचे कास्टिंग मॅच करण्यासाठी आम्ही मंथनची निवड केली. हे तिघेही या भूमिकांसाठी अगदी योग्य आहेत. श्रेयस आणि मंथनचा प्रमुख भूमिका असणारा हा पहिलाच चित्रपट आहे. या तिघांच्याही अभिनयाने चित्रपटात अधिकच रंगत आणली आहे. मला खात्री आहे प्रेक्षकांना देखील या तिघांचा अभिनय नक्कीच आवडेल." निर्माते राजेश मापुस्कर म्हणतात, "रोहन मापुस्कर हे इंडस्ट्रीतील कास्टिंग डिरेक्टर म्हणून ओळखलं जाणारं नाव आहे. त्यामुळे त्याच्या चित्रपटात कोण झळकणार याची उत्सुकता मलाही खूप होती. 'एप्रिल मे ९९' हा चित्रपट मैत्री, तारुण्याच्या आठवणींना उजाळा देणारा असल्याने चित्रपटातील कलाकारांची योग्य निवड होणे, हे अत्यंत गरजेचं होतं आणि त्यानुसार ही निवड झाली आहे. मुलांची निवड झाल्यानंतर त्यांचे तीन महिन्यांचे वर्कशॉप घेण्यात आले. आता लवकरच प्रेक्षकांना त्यांची केमिस्ट्री पडद्यावर पाहायला मिळेल. हा एक कौटुंबिक चित्रपट असून तो सर्वांनी एकत्र पाहावा असा आहे.'' मापुस्कर ब्रदर्स इन असोसिएशन फिंगर प्रिंट फिल्म्स, नेक्सस अलायन्स, थिंक टँक आणि मॅगीज पिक्चर्स प्रस्तुत 'एप्रिल मे ९९' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन रोहन मापुस्कर यांनी केले असून राजेश मापुस्कर, मधुकर कोटीयन, जोगेश भूटानी , मॉरिस नून हे निर्माते आहेत तर लॉरेन्स डिसोझा सह निर्माते आहेत. येत्या मे महिन्याच्या सुट्टीत म्हणजेच १६ मे रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

**- किरण घायदार, नाशिक**

# बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करा : शिवा सुराशे





## सलग तिसऱ्या दिवशी शिक्षक परिषदेचे आंदोलन सुरूच

**निफाड ।** पंचायत समिती निफाड समोर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद राज्य सरचिटणीस कार्यवाह संजय बबनराव पगार यांच्या नेतृत्वात सातवा वेतन आयोग सेवा पुस्तक पडताळणी संबंधी अक्षम्य दिरंगाई बाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणे बाबत मागणी पूर्ण न झाल्याने सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन सुरू आहे.

ऑगस्ट २०१८ रोजी सातव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती झाल्यानंतर तब्बल सात वर्षे होऊन गेली परंतु अद्यापही संबंधित सेवा पुस्तकांची पडताळणी शिक्षण विभागाने केलेली नाही. या कारणास्तव संबंधित दिरंगाई करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई होईपर्यंत प्रथम दोन दिवस धरणे आंदोलनानंतर घंटानाद आंदोलन सुरू आता साखळी व आमरण उपोषण करण्याचा इशारा शिक्षक परिषदेने दिला आहे. पंचायत समिती माजी सभापती शिवा सुराशे यांनी आंदोलनाला भेट देऊन शिक्षकांना आपल्या मागण्यांसाठी आपल्याच कार्यालयाकडे आंदोलन करावे लागते ही चांगली बाब नव्हे. अधिकाऱ्यांनी त्वरित दखल घ्यावी. गटविकास अधिकारी गटशिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करून बेजबाबदार कर्मचार्यांवर कारवाई करा अन्यथा आम्ही आंदोलन हातात घेऊ, असा इशारा दिला.

आंदोलनादरम्यान निफाड गटविकास अधिकारी तुकाराम जाधव यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिरंगाईस जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची कारवाई करून सादर करणेबाबत आदेशित केले आहे. परंतु अद्यापही त्यासंबंधी कार्यवाही झालेली नाही. सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन सुरू असताना शिक्षक सेनेचे बबनराव चव्हाण, जितेंद्र मानकर, विनायक केंद्रे आदींनी उपस्थित राहून सक्रिय पाठिंबा दिला. राज्य सरचिटणीस कार्यवाह संजय बबनराव पगार, राज्य उपाध्यक्ष दीपक खैरनार, विभागीय अध्यक्ष वासुदेव बोरसे, जिल्हाध्यक्ष रमेश गोहिल, जिल्हा सरचिटणीस रावसाहेब जाधव, जिल्हा कोषाध्यक्ष सुनील अहिरे, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष जितेंद्र खोर, जिल्हा सहकार्यवाह विलास शिंदे, जिल्हा महिला आघाडी प्रिती कामडी, माधवी वैद्य, निफाड तालुका नेते प्रवीण कोळी, निफाड तालुकाध्यक्ष संदीप गायकवाड, दिंडोरी तालुकाध्यक्ष सुभाष बर्डे, इगतपुरी तालुकाध्यक्ष वैभव उपासनी, येवला तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे, बागलाण तालुकाध्यक्ष संजय पाटील, सिन्नर तालुकाध्यक्ष विलास मोरे, कार्यवाह/सरचिटणीस विलास पानपाटील, भीमराव जाधव, उमेश शिंदे, चिंतामण मोहन, अशोक पवार,मुकुंद मोरे, किरण काकडे, पुंडलिक शिंगाडे, विजय ठाकरे, नितीन शिंदे, विश्वास आहेर, विकास पाटील, उत्कर्ष कोंडावार, किरण पाटील, राहुल परदेशी, कैलास बांगर, परशराम ठाकरे, अरविंद माळी, अनिल धनवटे, वैशाली जाधव, उदयकुमार कुर्हाडे, राजेंद्र गाडे, दत्तात्रय कमोदकर, रवींद्र भरसट, अनिल खैरनार, विलास पानपाटील, अविनाश पाटील, मानसिंग महाले, विश्वास आहेर, चिंतामण भदाणे, किशोर मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# सेन्सेक्स 317 अंकांनी वाढला
## गुंतवणूकदारांना 3 लाख कोटींचा नफा

**मुंबई, दि.२७ प्रतिनिधी**

एक दिवसाच्या घसरणीनंतर आज 27 मार्च रोजी भारतीय शेअर बाजार पुन्हा तेजीत आले. सेन्सेक्स 317 अंकांनी वाढून बंद झाला. तर निफ्टीने झेप घेत 23,600 चा टप्पा पार केला आहे. बँकिंग आणि वित्तीय शेअर्समध्ये वाढलेली रुची आणि परदेशी गुंतवणूकदारांनी केलेली खरेदी यामुळे बाजाराला बळ मिळाले. त्यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांनी तीन लाख कोटी रुपयांचा नफा कमावला.

लघु आणि मध्यम शेअर्समध्येही तेजी आली. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप दोन्ही निर्देशांक वाढीसह बंद झाले. ऑटो वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकही वधारले. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 317.93 अंकांनी वधारून



77,606.43 वर बंद झाला. तर निफ्टी 105.10 अंकांनी वाढून 23,591.95 वर बंद झाला.

बीएसईवर सूचिबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 27 मार्च रोजी 414.74 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे, जे त्याच्या आधीच्या व्यवहाराच्या दिवशी म्हणजे बुधवार 26 मार्च रोजी 411.61 लाख कोटी रुपये होते. अशाप्रकारे सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल 3.13 लाख कोटी रुपयांनी वाढले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 3.13 लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील 30 पैकी फक्त 20 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये बजाज फिनसर्व्हच्या शेअर्समध्ये सर्वाधिक 3.23 टक्के वाढ झाली. यानंतर इंडसइंड बँक, एनटीपीसी, लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी) आणि अल्ट्राटेक सिमेंटचे समभाग 1.40 ते 2.68 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

**सेन्सेक्स 77,606**

**निफ्टी 23,591**

सेन्सेक्सचे 10 शेअर्स घसरणीसह बंद झाले. यामध्येही टाटा मोटर्सचे शेअर्स 5.56 टक्क्यांनी सर्वाधिक घसरले. तर सन फार्मा, कोटक महिंद्रा बँक, भारती एअरटेल आणि एचसीएल टेक यांचे शेअर्स 0.40 टक्क्यांपासून 1.41 टक्क्यांपर्यंत घसरले.

राठी नववर्षाची सुरूवात म्हणजेच गुढीपाडवा जवळ येत आहे. त्यापार्श्वभूमीवर सराफा बाजारात सोने खरेदीसाठी लगबग दिसून येत आहे. त्यामुळे सोन्याच्या किंमतींमध्ये वाढ झाली असून चांदी मात्र १ लाखाच्या आसपास ट्रेड करीत आहे. जागतिक घडामोडींमुळेही सोने-चांदीच्या दरांमध्ये चढ-उतार होत असते.

आज अमेरिकेच्या कॉमेक्सवर सोन्याची किंमत ३०६७.१० डॉलर्स प्रति औंस इतकी आहे तर चांदीची किंमत ३४.३३ डॉलर्स प्रति औंस इतकी आहे. यासोबत देशातील मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर (MCX) सोन्याची किंमत ८८,०८१.०० रुपये प्रति १० ग्रॅम आहे तर चांदीची किंमत ९९,६९५.०० रुपये किलो इतकी आहे.

# भारताने वाचवले लाखो बालकांचे प्राण
## संयुक्त राष्ट्राने केले तोंड भरून कौतुक

**नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्रसंघाने टाळता येण्याजोगे बालमृत्यू कमी करण्याच्या दिशेने भारताच्या प्रयत्नांचे आणि प्रगतीचे कौतुक केले आहे. "आदर्श आणि अनुकरणीय उदाहरण" अशा शब्दात यूएनने भारताचा गौरव केला आहे.

यूएनने म्हटले आहे की, भारताने आपल्या आरोग्य यंत्रणेमध्ये धोरणात्मक गुंतवणूक बालमृत्यू रोखण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे लाखो बालकांचे जीव वाचले आहेत.

संयुक्त राष्ट्राच्या या अहवालामुळे भारताच्या आरोग्य क्षेत्रातील एतिहासिक प्रगतीचे जागतिक स्तरावर कौतुक झाले आहे. पीटीआयने याबाबतचे वृत्त दिले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या इंटर-एजन्सी ग्रुप फॉर चाईल्ड मॉर्टेलिटी एस्टिमेशन प्रकाशित केलेल्या अहवालात,



बालमृत्यू दर कमी करण्यात उल्लेखनीय प्रगती करणाऱ्या पाच देशांची नोंद केली आहे.

यात भारत, नेपाळ, सेनेगल, घाना आणि बुरुंडी या देशांचा समावेश आहे. या देशांनी विविध धोरणांतून टाळता येणारे बालमृत्यू कमी करण्याच्या दिशेने वेगवान प्रगती साधली आहे.

या अहवालात म्हटले आहे की, "राजकीय इच्छाशक्ती, वैज्ञानिक संशोधनावर आधारित धोरणे आणि आरोग्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण गुंतवणूक यांच्या माध्यमातून, मर्यादित संसाधने असलेल्या देशांमध्येही लक्षणीय सुधारणांसह बालमृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटवता येऊ शकते. या यशामुळे जग टाळता येण्याजोग्या बालमृत्यूच्या संपूर्ण उच्चाटनाच्या दिशेने पुढे जात आहे. भारताने आरोग्य यंत्रणेमध्ये केलेल्या धोरणात्मक गुंतवणुकीमुळे आधीच लाखो बालकांचे प्राण वाचवले आहेत आणि कोट्यवधी बालकांच्या निरोगी आयुष्याची वाट मोकळी केली आहे."

सन 2000 सालापासून, भारताने पाच वर्षांखालील बालमृत्यूचे प्रमाण 70 टक्के आणि नवजात बालमृत्यूचे प्रमाण 61 टक्के कमी केले आहे. व्यापक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, वैद्यकीय सुविधा वाढवणे आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी तयार करणे यांसारख्या विविध उपक्रमांमुळे हे यश मिळाले आहे.

आयुष्मान भारत हा जगातील सर्वात मोठा आरोग्य विमा कार्यक्रम आहे, जो प्रतिकुटुंब दरवर्षी सुमारे 5500 अमेरिकी डॉलर (अंदाजे ₹4.5 लाख) इतके कव्हरेज प्रदान करतो.

भारताने आई व बाळांसाठी प्रतीक्षा गृहे, नवजात बालकांची काळजी घेणाऱ्या युनिट्स, जन्मजात व्यंग तपासणी कार्यक्रम यांसारख्या अनेक सुविधा विकसित केल्या आहेत. प्रत्येक गर्भवतीसाठी मोफत प्रसूती सुविधा (सीझेरियन सेक्शनसह), तसेच नवजात बालकांसाठी मोफत औषधोपचार, तपासण्या, वाहतूक आणि आहार सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

नवजात बालकांच्या आरोग्यासाठी अँटीनेटल कॉर्टिकोस्टिरॉइड्स (प्रिमॅच्युअर डिलिव्हरीसाठी), सतत सकारात्मक एअरवे प्रेशर (CPAP) उपचार, दृष्टी व श्रवण तपासणीसाठी नियमित फॉलो-अप, यांसारख्या विविध उपाययोजनांमुळे नवजात बालकांचे जीवन वाचवले जात आहे.

# समाज माध्यमांमुळे पकडली गेली 200 कोटींची करचोरी

**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

आयकर खात्याला अंधारात ठेवत रोख रक्कम मोजून महागड्या वस्तू खरेदी करत असाल किंवा दूरवरच्या प्रवासाचा आनंद घेत असाल तर या गोष्टी लपून राहणार नाहीत. व्हॉट्स ॲपसारख्या समाज माध्यमांच्या संदेशातून २०० कोटी रुपयांची करचोरी पकडण्यात यश आले आहे.



प्राप्तीकर विधेयक २०२५ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचे करताना सीतारामन यांनी सांगितले की, आयकर खात्याच्या अधिकाऱ्यांना व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्राम आणि गुगल मॅपसह लोकांच्या सोशल मीडियावरील हॅण्डल्स तपासण्याचे अधिकार आवश्यक झाले आहेत. केवळ व्हॉट्सॲप तपासणीतून २०० कोटींची करचोरी पकडताना या करचोरांची गुगल मॅपची हिस्ट्री महत्त्वाची ठरली. इन्स्टाग्राम अकाऊंटवरील तपशील उपयोगी ठरले. ही मंडळी रोख रक्कम दडवण्यासाठी वारंवार विशिष्ट ठिकाणी जात होती. त्यांच्या डीजिटल पाऊलखुणांमुळे त्यांच्या बेनामी मालमत्तांचाही शोध लागला. सीतारामन म्हणाल्या, एखाद्या प्रकरणामध्ये ती व्यक्ती सरकारला मदत करत नसेल तर त्याच्याकडे असणारा डाटा सरकार शोधून त्याची माहिती मिळवत आहे.


प्राप्तीकर विधेयक २०२५ लोकसभेत संमत झाले आहे. या विधेयकातील तरतुदींमुळे प्राप्तीकर अधिकाऱ्यांना मोठे कायदेशीर बळ मिळाले आहे. हे अधिकारी एखाद्याचे डिजिटल रेकॉर्ड मिळवून त्याने करचोरी केली आहे का हे सहजपणे तपासू शकतील. १ एप्रिल पासून या नव्या कायद्याची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे वैयक्तिक प्राप्तीकर दात्याला त्याचा परतावा मिळवणे अत्यंत सुलभ होणार आहे, असेही सीतारामन यांनी सांगितले.

सायबर क्राईम आणि डिजिटल घोटाळे निपटून काढण्यासाठी सरकारने व्यापक मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत अशा प्रकरणात ७.८१ लाख सीमकार्ड बंद करण्यात आली आहेत, अशी माहिती केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजयकुमार यांनी दिली. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत ३९६२ स्काईप खाती तसेच ८३६६८ व्हॉट्सॲप खाती बंद करण्यात आली आहेत. याद्वारे डिजिटल अरेस्टसारखे प्रकार उघडकीस आले होते.

# पुतिन यांचा लवकरच मृत्यू होईल
## झेलेन्स्की यांचा खळबळजनक दावा

**पॅरिस, दि. २७ वृत्तसंस्था**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी एका खळबळजनक दावा केला आहे. झेलेन्स्की यांना रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचा लवकरच मृत्यू होईल आणि याबरोबरच दोन्ही देशातील युद्ध संपुष्टात येईल असा दावा केला आहे. झेलन्स्की यांवी गेल्या काही दिवसांपासून पुतिन यांच्या प्रकृतीबद्दल सुरू असलेल्या वेगवेगळ्या चर्चांदरम्यान पॅरिस येथे एका मुलाखतीत बोलताना हा दावा केला आहे.



फ्रान्सचे पंतप्रधान इमॅन्युएल मॅक्रॉन यांची बुधवारी भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना झेलेन्स्की म्हणाले की, “त्यांचा (पुतीन) लवकरच मृत्यू होईल आणि ही खरी गोष्ट आहे, याबरोबरच हे (युद्ध) संपुष्टात येईल.”

गेल्या काही महिन्यांपासून पुतिन यांच्या आरोग्याबद्दल वेगवेगळ्या चर्चा आणि अफवा पसरताना पाहायला मिळत आहे. यातच पुतिन यांचे सतत खोकला येत असल्याचे आणि त्यांचे हातपाय विनाकारण हालत असल्याचे व्हिडीओ समोर आल्याने या अफवांमध्ये आणखी भर पडली आहे. २०२२ मध्ये समोर आलेल्या एका व्हिडीओमध्ये माजी सरंक्षण मंत्री रर्गेई शोईगू यांच्याबरोबरच्या एका बैठकी दरम्यान पुतीन टेबलाला पकडून मान खाली घालून खुर्चीवर बसल्याचे दिसून आले होते.

तसेच पुतिन यांना पार्किन्सन आजार झाल्याचे आणि ते कर्करोगाशी झुंज देत असल्याचा दावा देखील काही रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे. पण या दाव्यांना अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. इतकेच नाही तर रशियन सरकारने हे दावे वेळोवेळा फेटाळून लावले आहेत.

युक्रेनचे नेते झेलेन्स्की यांनी शांततेचा प्रस्ताव फेटाळून लावत रशियाने दोन देशांमधील संघर्ष लांबवल्याचा आरोप केला आहे. “रशियाला हे युद्ध सुरू ठेवायचे आहे. ते हे (युद्ध) पुढे ढकलत आहे. खरोखर हे युद्ध संपावे यासाठी आपण रशियावर दबाव टाकण्याची आवश्यकता आहे,” असेही झेलेन्स्की यावेळी म्हणाले.

# पुण्यातील स्वारगेट प्रकरणातील पीडित मुलीचे पोलिसांवर गंभीर आरोप
## राज्याच्या सचिवांना लिहिले पत्र

**पुणे, दि. २७ प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट प्रकरणातील पिडीत तरूणीने पोलिसांवरती गंभीर आरोप केले आहेत. राज्याच्या सचिवांना पत्र लिहून पीडितेने हे आरोप केले आहेत. यामध्ये तरूणीने आरोपी दत्ता गाडेने माझ्यावर दोनवेळा बलात्कार केला. तिसऱ्यांदा त्याला आपल्यासोबत अनैसर्गिक कृत्य करायचे होते, मात्र आपण विरोध केल्याने तो पळून गेला. या प्रकरणाची चौकशी सुरु झाली तेव्हा आपली इच्छा नसताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपली वैद्यकीय चाचणी केली, असं या तरूणीने म्हटलं आहे. त्याचबरोबर पुरुष पोलीस अधिकारी देखील आपल्याकडे चौकशी करत होते असं या मुलीने म्हटलं आहे.

तर आपल्या चारित्र्यावर संशय व्यक्त करणारी वक्तव्ये आरोपीच्या बाजुने आणि



काही राजकिय नेत्यांनी केली. आपली बदनामी थांबवण्यात यावी आणि अशा वक्तव्यांवर बंदी घालण्याची मागणी आपण पोलीस आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. मात्र दाद मिळाली नाही. या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून अजय मिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अजय मिसर यांच्याबद्दल आपल्याला आत्ताच आक्षेप घ्यायचा नाही. मात्र त्यांच्यावर आक्षेप घेता येईल अशी माहिती आपल्याकडेच उपलब्ध आहे. या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून असीम सरोदे यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी तिने केली आहे.

# 'जयभीम पँथर – एक संघर्ष' चित्रपटाचे दमदार म्युझिक लाँच

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला यंदा नव्या गाण्यांचा गजर होणार आहे. ११ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'जयभीम पँथर – एक संघर्ष' या चित्रपटाचं म्युझिक लाँच नुकतेच करण्यात आलं. याप्रसंगी निर्माते भदंत शीलबोधी थेरो, भिक्खू संघ, मा भीमराव आंबेडकर साहेब, सिद्धार्थ कासारे, मा. सागर संसारे, मिलिंद शिवशरण, संजय भाऊ खंडागळे चित्रपटातील कलाकार आणि प्रोजेक्ट हेड संतोष गाडे, कार्यकारी निर्माता बाबासाहेब पाटील, कलादिग्दर्शक प्रकाश सिंगारे आवर्जून उपस्थित होते. अत्यंत संवेदनशील आणि दमदार गाणी या चित्रपटातून आपल्या भेटीस येणार आहेत.



भदंत शीलबोधी थेरो यांच्या नवयान ड्रीम फिल्म प्रोडक्शनद्वारे निर्मिती होत असलेला "जयभीम पँथर" एक संघर्ष हा महत्त्वाचा चित्रपट ठरणार आहे. आयु. रामभाऊ तायडे हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. संपूर्ण बौद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील भारत निर्माण करण्यासाठी चित्रपट, मालिका अशा माध्यमातून नवनिर्मिती करण्याचा या निर्मिती संस्थेचा मानस आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन निशांत नाथाराम धापसे यांनी केले आहे. चित्रपटाचे संगीत, पार्श्वसंगीत रोहित नागभिडे यांचे असून चित्रपटात २ गीते आहेत ज्याचे लेखन निशांत नाथाराम धापसे यांनी केले आहे.'माझ्या भीमाची जयंती' हे गीत सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या दमदार आवाजात स्वरबद्ध करण्यात आले आहे तर 'जयभीम घोष होऊ दे' हे गाण अजय देहाडे, शुभम म्हस्के यांचा सुमधुर आवाजात रेकॉर्ड करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी वेगवेगळी गाणी तयार केली जातात. आता 'जयभीम पँथर – एक संघर्ष' या चित्रपटाची ही दोन नवी गाणी चळवळीला मिळणार आहेत.

'जयभीम पँथर – एक संघर्ष' मध्ये गौरव मोरे, चिन्मय उदगीरकर, मिलिंद शिंदे, अभिजीत चव्हाण, सोनाली पाटील, शशांक शेंडे, जयवंत वाडकर, संजय कुलकर्णी, प्रवीण डाळिंबकर, विनय धाकडे आणि प्रियांका उबाळे यांसारखे अनुभवी आणि लोकप्रिय कलाकार महत्त्वाच्या भूमिका आहेत.

**सिनेरंग**

# 'बंजारा'चा टीझर प्रदर्शित

**लोकरंजन**




मैत्री आणि आत्मशोधाचा अर्थ उलगडून भावनिक प्रवास घडवून आणणारा 'बंजारा' चित्रपट येत्या १६ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. 'बंजारा' हा मराठी चित्रपटसृष्टीतील पहिलाच चित्रपट आहे, ज्याचे चित्रीकरण सिक्कीमसारख्या निसर्गरम्य ठिकाणी झाले आहे. सिक्कीमच्या १४ हजार फूट उंच पर्वतरांगांमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण झाले असून, हा चित्रपट म्हणजे प्रेक्षकांसाठी एक अनोखा अनुभव ठरणार आहे. वी. एस. प्रॉडक्शन्स आणि मोरया प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन स्नेह पोंक्षे यांनी केले आहे. या चित्रपटात शरद पोंक्षे, भरत जाधव, सुनील बर्वे, स्नेह पोंक्षे, सक्षम कुलकर्णी आणि आदित्य धनराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तर रोहिणी विजयसिंह पटवर्धन आणि शरद पोंक्षे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे.

नुकत्याच झळकलेल्या टीझरमध्ये तीन मित्रांची मोटरसायकलवरून सुरू झालेली सफर पाहायला मिळत आहे. मात्र यात दोन वेगळ्या जनरेशन्सच्या मित्रांचे गट दिसत असून हे निश्चितच प्रेक्षकांची चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढवणारे आहे या मित्रांचा हा अनोखा प्रवास कसा त्यांच्या मैत्रीला एक वेगळी दिशा देणार, हे प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच समजेल.

# झी नाट्य गौरव पुरस्कार सोहळा झी मराठीवर

यंदाचा ‘झी नाट्य गौरव पुरस्कार २०२५’ सोहळा हा खूप अविस्मरणीय असणार आहे. कारण ह्या वर्षी झी नाट्य गौरव पुरस्काराचं २५ वं वर्ष आहे. अनेक दिग्गज कलाकारांचे धमाकेदार परफॉर्मन्स आणि गाजलेल्या नाटकांमधील प्रवेश हा आकर्षणाचा विषय असणार आहे. रंगभूमीवर धमाकूळ घालणार भरत जाधव यांचं "श्रीमंत दामोदर पंत" प्रेक्षकांना पुन्हा झी नाट्य गौरवच्या मंचावर पाहायला मिळणार आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सध्या गाजत असलेलं आणि तिकीटबारीवर हाऊसफुल्लचा बोर्ड लावणार "शिकायला गेलो एक" या नाटकामधील प्रवेश प्रशांत दामले आणि हृषिकेश शेलार सादर करणार आहेत. मराठी नाट्यसृष्टीतील नामवंत मृणाल कुलकर्णी, सिद्धार्थ जाधव, सखी गोखले, सुव्रत जोशी, प्रियदर्शन जाधव, अदिती सारंगधर या आणि अश्या अनेक नामवंत कलावंतांची या सोहळ्याला हजेरी लागणार आहे. या सर्वांच्या उपस्थितीने आणि रसिक प्रेक्षकांच्या साथीने हा सुंदर सोहळा रंगणार आहे.



या सोहोळ्याचे आणखी एक आकर्षण ठरलं ते म्हणजे अभिजीत खांडकेकर आणि संकर्षण कऱ्हाडे यांचं सूत्रसंचालन. याचसोबत अनेक गोड सरप्राइझेस या नाट्यगौरवच्या निमित्ताने रसिकांना पाहायला मिळणार आहेत.

तेव्हा एका तिकिटात अनेक प्रयोग पाहण्याची नामीसंधी रसिक प्रेक्षकांना असणार आहे, तेव्हा पहायला विसरू नका 'झी नाट्य गौरव पुरस्कार २०२५' ३० मार्च संध्या. ६ वा. फक्त फक्त झी मराठीवर.

**टेलीरंग**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# संभल जामा मशीद समिती अध्यक्षांचा अंतरिम जामीन अर्ज फेटाळला

**संभल, दि. २७ वृत्तसंस्था**

संभल हिंसाचार प्रकरणी जामा मशीद समितीचे अध्यक्ष जफर अली यांचा अंतरिम जामीन अर्ज आज न्यायालयाने फेटाळला. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी केलेल्या आक्षेपार्ह विधानानंतर संभलमध्ये दंगल उसळली, असा आरोप जफर अली यांच्यावर आहे. त्यांना उत्तर प्रदेश पोलिसांना २३ मार्च रोजी ताब्यात घेतले होते. चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली. आज त्यांच्या अंतरिम जामीन अर्जावर सुनावणी झाली. न्यायालयाने अंतिरम जामीन अर्ज फेटाळला असून, आता नियमित जामीन अर्जावर २ एप्रिल रोजी सुनावणी होणार असल्याची माहिती सराकारी वकिलांनी दिली.न्यायालयाच्या आदेशानुसार, मागील वर्षी संभलमधील मशिदीच्या सर्वेक्षण करण्यात आले. याविरुद्ध करण्यात आलेल्या निदर्शनांवेळी झालेल्या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू झाला होता. तसेच अनेक जण जखमी झाले. जखमींमध्ये बहुतांश पोलीस होते. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचा वापर केला. पोलिसांनी घटनास्थळावरून जप्त केलेली शस्त्रे ब्रिटन आणि जर्मनीसह इतर देशांतील निर्मिती असल्याचे तपासात उघड झाले होते. 'एसआयटी'ने या हिंसाचाराशी संबंधित बारा प्रकरणांपैकी सहा प्रकरणांमध्ये ४,००० पानांपेक्षा जास्त पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे, ज्यामध्ये १५९ जणांना आरोपी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

# 22 वर्षांच्या नराधमाचा चौथीत शिकणाऱ्या मुलीवर अत्याचार

**गोंदिया, दि. २७ वृत्तसंस्था**

चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या 10 वर्षीय चिमुकलीवर 22 वर्षांच्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी तालुक्यात घडली आहे. या प्रकरणातील आरोपीला केशोरी पोलिसांनी अटक केली आहे. कमलेश मडावी (22) असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे गोंदिया जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

आरोपी आणि पीडिता चिमुकली ही एकाच गावातील रहिवासी असून शाळेला सुट्टी झाल्यानंतर चिमुकली ही घराच्या अंगणात खेळत होती. यावेळी आरोपी तिच्या घरी गेला व पिण्यासाठी पाणी मागितले व त्यानंतर चिमुकलीवर अत्याचार केले. ही बाब शेजाऱ्यांना लक्षात येताच शेजाऱ्यांनी पिडीतेच्या कुटुंबीयांना याची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन गाठत या घटनेची माहिती पोलिसांना दिली. याप्रकरणी पोलिसांनी कलम 65/2, पॉस्को 4/6/8 व 332 अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक केली आहे. घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली केशोरीचे पोलीस निरीक्षक गणेश वनारे करीत आहेत.

# चार निष्पाप मुलांची हत्या करुन बापाने घेतला गळफास

**शाहजहांपूर, दि. २७ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर जिल्ह्यातील मानपूर चचरी गावात एक हृदयद्रावक घटना घडली. राजीव या रहिवाशाने आपल्या चार मुलांची निर्घृण हत्या करुन नंतर स्वतः गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेच्या वेळी त्याची पत्नी माहेरी गेली होती. सकाळी राजीवचे आजोबा घरात आले असता त्यांना हा भयावह प्रकार दिसला. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

रोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मानपूर चचरी गावात ३६ वर्षीय राजीव कठेरिया त्याची पत्नी कांति देवी आणि चार मुलांसह राहत होता. त्याची मुले स्मृती (१३), कीर्ती (९), प्रगती (७) आणि ऋषभ (५) होती. बुधवारी कांति देवी तिच्या माहेरी, करतोली गावाला गेली होती. घरी राजीव आणि त्याची चार मुले होती. त्यानंतर पत्नी घरात नसलेले बघून हे निर्घृण कृत्य त्याने केले.

गुरुवारी सकाळी राजीवचे वडील पृथ्वीराज यांनी आपल्या नातवाला चहा प्यायला बोलावले, पण आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. बराच वेळ वाट पाहून त्यांनी घरात डोकावून पाहिले असता त्यांना भयंकर दृश्य दिसले. यावेळी चारही मुलांचे गळे धारदार हत्याराने चिरलेले दिसले. तर मुलांचा बाप राजीव छताला साडीच्या सहाय्याने लटकलेला आढळून आला. त्यांनी जोरात आरडाओरडा केला आणि काही वेळातच गावकऱ्यांची गर्दी जमली. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक राजेश द्विवेदी पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले.

राजीवच्या वडिलांनी सांगितले की, एका वर्षापूर्वी त्याचा अपघात झाला होता, त्यानंतर तो मानसिकरीत्या अस्वस्थ राहत होता. अनेकदा तो विचित्र वागायचा. कधी कधी त्याच्या मनावर प्रचंड ताण यायचा आणि तो अनियंत्रित होत असे. एसपी राजेश द्विवेदी यांनी सांगितले की, पोलिसांनी तपास सुरू केला असून प्राथमिकदृष्ट्या ही घटना मानसिक तणावामुळे घडल्याचे दिसते. मात्र, अधिक तपासानंतरच नेमके कारण स्पष्ट होईल.

# रसवंती चालवणाऱ्याला 7.8 कोटींचा टॅक्स भरण्यासाठी आयकरची नोटीस

**अलिगढ, दि. २७ वृत्तसंस्था**

ऊसाचा रस विकून दिवसाला ५०० ते ६०० रुपये कमावणाऱ्या एका व्यक्तीला आयकर विभागाने कर न भरल्याबद्दल नोटीस पाठवली. ही नोटीस जेव्हा या रसवंती चालवणाऱ्या व्यक्तीला मिळाली, तेव्हा त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. कारण ही रक्कम होती ७.८ कोटी रुपये!

ज्या व्यक्तीला आयकर विभागाने ७.८ कोटी रुपये टॅक्स भरण्याची नोटीस पाठवली आहे, त्या व्यक्तीचे नाव आहे रईस अहमद. ते अलिगढमध्ये रसवंती चालवतात. पाचशे ते सहाशे रुपये इतकी त्यांची दिवसाची कमाई आहे. पण, ७.८ कोटी रुपये टॅक्स भरण्याची नोटीस बघून त्यांचं ब्लड प्रेशरच वाढलं.

रईस अहमद यांना टपालद्वारे ही नोटीस मिळाली. त्यांना २८ मार्चपर्यंत उत्तर देण्यासही सांगण्यात आले. त्यामुळे रईस अहमद यांनी आयकर विभागाच्या स्थानिक कार्यालयात धाव घेतली. तिथे त्यांनी अधिकाऱ्यांकडे या नोटीसबद्दल चौकशी केली.

अधिकाऱ्यांनी सांगितलं की, तुमच्या (रईस अहमद) पॅन कार्डवरून मोठ्या रकमांचे व्यवहार झाले आहेत. त्यावर रसवंतीवाल्याने अधिकाऱ्याने सांगितले की, त्याने असे कोणतेही मोठ्या रकमांचे व्यवहार केले नाहीत.

अलिगढ आयकर विभागातील अधिकारी नैन सिंग यांनी सांगितले की, आम्ही त्यांना (रईस अहमद) सांगितले की, जर तुमचा पॅन नंबर गैरवापर झाला असेल, तर तुम्ही तशी तक्रार पोलीस ठाण्यात द्या.

आयकर अधिकाऱ्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार आता रईस अहमद यांनी पॅन नंबरचा गैरवापर झाल्याची तक्रार दिली. सिव्हील लाईन पोलिसांनी बुधवारी याप्रकरणी गुन्हा दाखल करून घेत तपास सुरु केला आहे. पण, इतकी मोठी रक्कम भरण्याची नोटीस आल्यामुळे रईस अहमद यांना मोठा धक्का बसला आहे.

# अप्सरा हत्याकांड प्रकरणात पुजारी व्यंकट साई सूर्य कृष्णला जन्मठेप

**हैदराबाद, दि. २७ वृत्तसंस्था**

हैदराबाद येथील सरुर नगरमधले अप्सरा हत्याकांड चर्चेत आले होते. या प्रकरणात न्यायालयाने पुजारी व्यंकट साई सूर्य कृष्ण याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसंच पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी सात वर्षांची अतिरिक्त शिक्षाही सुनावली आहे. व्यंकट साईने त्याची प्रेयसी अप्सराला लग्नाचं वचन दिलं होतं आणि त्यानंतर जेव्हा तिच्याकडून लग्नासाठी आग्रह होऊ लागला तेव्हा तिची हत्या केली. हे प्रकरण गाजलं होतं.

व्यंकट साई सूर्य कृष्ण हा मंदिरातला पुजारी होता. त्याची ओळख सरुर नगर येथे राहणाऱ्या अप्सरा या तरुणीशी झाली. या दोघांची मैत्री झाली त्यानंतर मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. त्यानंतर या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला कारण व्यंकट साईने अप्सराला लग्नाचं वचन दिलं होतं. अप्सरा लग्नासाठी आग्रह करु लागली. ज्यानंतर व्यंकट साईने तिची हत्या केली. २०२३ चं हे प्रकरण आहे. व्यंकट साईचं लग्न आधीच झालेलं होतं. त्याला अप्सराशी लग्न करायचं नव्हतं त्यामुळे त्याने तिची हत्या केली आणि नंतर ती बेपत्ता झाल्याचा बनाव रचला होता.

पोलिसांनी या प्रकरणी कसून तपास केल्यानंतर अखेर सगळं वास्तव समोर आलं. पोलिसांनी पुरावे गोळा केले आणि व्यंकट साईला अटक केली. या प्रकरणी दोन वर्षे खटला चालला. विविध साक्षी पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. ज्यानंतर न्यायालयाने पुजारी व्यंकट साईला दोषी मानलं. त्याला आता जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. व्यंकट साईने फक्त प्रेयसीला ठार केलं असं नाही तर हत्येचे पुरावेही नष्ट केले. पण पोलिसांनी त्याच्या सगळ्या कटाचा पर्दाफाश करुन त्याला अटक केली.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com